## या अंकांत—


- आदि ग्रंथांतील नामदेवांची ओवी
- अरविंदांचा पूर्णयोग आणि दिव्यजीवन
- भागवत ग्रंथाचें महात्म
- भागवत धर्माचें स्वरूप
- स्वामी रामतीर्थ पुण्यस्मरण
- संतश्रेष्ठाचे हिंदी अभंग
- तुकोबांचे दोन अभंग
- एकनाथस्वामींची शिकवण
- कल्याणकारी कथा
- शिरडी वृत्त


मार्च १९६८

स्थापना १९१६



साईबाबांच्या मूर्ती,
पूजेचीं भांडीं
व
चांदीचे
सोन्याचे
मोत्यांचे

सर्व प्रकारचे दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू
सुप्रसिद्ध पेढी

# ई. आर. मालपेकर,

जितेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं.
३५५७२१



# श्री सा ई वा क्सु धा

"धैर्य—धीर धरून वागणें म्हणजेच सबुरी. तिला कधींही दूर सारतां नये. नेहमीं तिच्या सहवासांत राहिलें पाहिजे. कोणतेंही लहानमोठें संकट येवो. त्या त्यावेळीं तीच तुमचें रक्षण करील. पुरुषांचा खरा पुरुषार्थ तिची कांस धरण्यांत आहे. तुमच्या पापाचें, तापाचें नि दैन्याचें निवारण करण्याचें सामर्थ्य तिच्या ठायीं आहे. मोठ्या युक्तिप्रयुक्तींनें संकटप्रसंगीं बचाव करणारी तीच. तिची कांस धरणाऱ्यानें कशाचीही भीति बाळगण्याचें कारण नाहीं."

—श्रीसाईसच्चरित्

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४६ वें ] मार्च १९६८ [ अंक १२ वा

: संपादक :

श्री. द. दि. पाटणकर

वार्षिक वर्गणी रु. ५ ( ट. ख. सह )

टे. नं. ४५३३६१

: कार्यालय :

साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ,

प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई १४.

# प्रिय वाचक—

प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या चिंतेंत पडलेला असतो; परंतु चिंता कां करायची ? तुम्हीं चिंता करून काय होणार आहे ? मग उगाच चिंता करण्यांत वेळेचा दुरुपयोग कां करायचा? शिवाय चिंताग्रस्त माणूस आपल्या हातांतील कामाकडे जसें द्यावें तसें लक्ष देऊं शकत नाहीं.

ज्यानें जन्म दिला त्याला तुमची चिंता आहे. तो परम दयाळू आहे. तुम्हांला जरूर तेथें हात देऊन तो चिंतामुक्त केल्याशिवाय रहाणार नाहीं. परंतु तुमची तशी श्रद्धा पाहिजे ना ? त्याच्यावर सारा भरिभार टाका. चिंते ऐवजी श्रद्धेनें त्याचें चिंतन करा. तुमची चिंता दूर झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

आणि म्हणूनच बाबांनीं श्रद्धा आणि सबुरीचें महत्त्व गायिलें आहे. तुम्हीं धीर धरला पाहिजे व त्याच्या जोडीला श्रद्धेला अंतःकरणांत स्थान दिलें पाहिजे.

अंतःकरणापासून त्याचें चिंतन करावयाचें; सारा भरिभार त्याच्यावर सोपवावयाचा. देवानें तुम्हांला जीं इंद्रियें दिलीं आहेत त्यांच्या सहाय्यानें आपलें कामकाज उत्तमप्रकारें पार पाडण्यासाठीं झटावयाचें; जें कांहीं करायचें तें त्याच्यासाठीं मनोभावें करावयाचें, कोणाची कोण त्याहीप्रकारें सेवा करण्याची संधी मिळाली असतां ती साधावयाची व त्या त्या वेळीं म्हणायचें कीं, 'हें पुष्प देवा तुजला वहातों !'

अशी ही सत्कृत्यांची पुष्पमाला आपण जन्मभर गुंफावची आहे. ही माला कोणासाठीं ? त्या जन्मदात्याला—भगवंताला अर्पण करण्यासाठीं !

'ही पुष्पमाला गुंफण्यासाठींच आपला जन्म. तीच जन्माची इतिकर्तव्यता. चिंता करीत रडण्यासाठीं आपला जन्म नाहीं. तिच्यावर मात करण्यासाठीं जय मिळविण्यासाठीं आपला जन्म आहे.

आम्हीं कोणतेंही कार्य त्याच्यासाठीं त्याच्या नावें करूं लागलों म्हणजे तें चांगलेंच कार्य असणार व तें उत्तम प्रकारें पार पडणार आयुष्यभर हेंच व अशा रीतीनें करायचें आहे. सदाचार तो हाच यशस्वी व सुगंधीत जीवन म्हणतात, तें यालाच. ज्याच्या जीवनांत अशा-प्रकारचा सदाचार नाहीं त्याला जिवंत माणूस म्हणतां येणार नाहीं. त्याची गणना मेलेल्यांत करावी लागेल, तुम्ही खूब सुंदर असाल; तुमच्या अंगावर सुंदर कपडे असतील, त्यांना अत्तर चोपडलें असेल ! गळ्यांत सुंदर कंठा असेल; परंतु तुमच्या

अंतःकरणांत जर का सदाचाराची सजावट झालेली नसेल तर त्या बाह्य देखाव्याचा काय उपयोग ? तें बाह्य वैभव, सौंदर्य क्षणीक आहे; सदाचार हाच शाश्वत व तुमचे कल्याण साधणारा आहे. यासाठीं सदाचाराची कांस धरायची.

आपल्या अंगीं सद्‌गुण कसे बाणतील याची आपण काळजी वहायची आहे. सदैव सद्‌गुणांची जोपासना व सद्‌गुणांचें पूजन करावयाचें. भगवंताची अहर्निश पूजाअर्चा करावयाची ती सद्‌गुण पुष्पांनी देवाला सद्‌गुणी माणसें आवडतात. दुर्गुणी नाहीं. मग आपण दुर्गुणांचा त्याग करून सद्‌गुणाची कास नको का धरायला ? जें त्याला आवडतें तें करावयाचें या धोरणानें आपण वागावयाचें आहे.

जो सदाचारी आहे त्यांचेंच लक्ष भगवत चरणांकडे लागून राहिलेलें असतें. आणि ज्याचें लक्ष त्याच्या चरणांकडे लागून राहिलेले असते, त्याला चिंतेची वा दुःखाची बाधा सहन होणार नाहीं. त्याच्यावर दुःखआपदा येणार नाहींत आणि पूर्वकर्मानुसार आल्या तरी त्यांना तो आनंदानें व सहज रीतीनें तोंड देण्यास समर्थ बनलेला असतो. अडचणी या त्याला अडचणी भासणार नाहींत. त्याच्या कृपेनें आलेल्या अडचणीतून किंवा संकटांतून तो सहज मार्ग काढूं शकेल.

तेव्हां निष्ठापूर्वक त्याचे चिंतन करून आम्ही संकटपार होऊं या व हें जीवन शोभवूं या.

— संपादक



Statement about ownership and other particulars about News paper (SHRI SAI SEELA) to be published in the first issue of every after last day of February.

## FORM IV

(See Rule 8)

1 Place of Publication : 804-B, Sai Niketan, Dr. Ambedkar Road, Bombay 14

2 Periodicity of its publication : Monthly

3 Printer's Name : Sharad Krishnaji Sapte
Nationality : Indian
Address : Rukmini Niwas, Morbaug, Road, Dadar, Bombay 14.

4 Publisher's Name : Dattatray Dinkar Patankar
Nationality : Indian
Address : Sai Niketan, 804-B Dr. Ambedkar Road, Bomday 14.

5 Editor's Name : Dattatray Dinkar Patankar
Nationality : Indian
Address : Sai Niketan, 804-B Dr. Ambedkar Road, Dadar, : Bombay 14.

6 Name aud Address of individuals who own the News paper and Partners or Share-Holders holding more than one per cent of the total capitai. : Shri Sai Baba Sansthan, Shirdi (a Charitable and Religious Institution) Post Office : Shirdi Dist : Ahmednagar.

I, Dattatray Dinkar Patankar, hereby declare that particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Signature of Publisher.

20 February 1968.

**D. D. Patankar**
Receiver, Shri Sai Baba Sansthan, Shirdi

# आदि ग्रंथांतील नामदेवांची वाणी

लेखक : **गणेश विष्णु कविटकर,** एम्. ए.

**श्रीगुरु ग्रंथ साहेबजी**

नामदेवांचा तिसरा काव्य-संग्रह शिखांच्या पवित्र श्रीगुरुग्रंथ साहेबजीमध्ये आढळून येतो. या ग्रंथाचे संकलन शिखांचे पांचवे धर्मगुरु अर्जुनदेव यांनीं १६०४ मध्यें ( संवत् १६६१ ) गुरुमुखी लिपींत केले. ह्या रचनेत भूतपूर्व चार गुरुंची वाणी, हिंदु भक्तांचे काव्य व मुस्लीम सूफींची कवने ग्रथित केली आहेत. संवत् १७६५ ) मध्यें दहावे धर्मगुरु गोविंदसिंह यांनीं गुरु तेग बहाद्दूरांच्या रचनेची भर घालून, या धर्मग्रंथाला शेवटचे रूप दिले व श्रीगुरूंचा सर्व भार ग्रंथसाहेबावर केंद्रित करून आपली जीवनज्योत परमज्योतींत विलीन केली. या ग्रंथाला आदिग्रंथ असेहि म्हणतात. ग्रंथाचे संपूर्ण नांव 'आदी श्रीगुरु ग्रंथसाहेबजी' असे आहे. हिंदूना, वेद, इस्लाम धर्मीयांना कुराण व ख्रिस्त धर्मीयांना बायबल. त्याप्रमाणेच शिखधर्मीयांना श्रीगुरु-ग्रंथसाहेब देवस्वरूप पूज्य आहे. शिख धर्मातील सर्व वैचारिक दर्शन या ग्रंथांत समाविष्ट झाले आहे.

**अनेक राग**

आदिग्रंथाची तीन निरनिराळ्या भागांत विभागणी करण्यात आली आहे. पहिला भाग सार्वजनिक प्रार्थना विषयक (Lithurgical) दुसरा स्तोत्र गीतांचा ( Hymns ) आणि तिसरा पुरवणी विभाग ( Supplimentary ) पहिल्या भागांत शिखधर्मगुरूंचा वाणी-संग्रह. श्रीगुरुग्रंथ हे एक शहर कल्पून प्रत्येक गुरूंची वाणी हा एक शहराचा विभाग ( महला ) कल्पिला आहे. सर्वप्रथम गुरु नानकांचा जपजीसाहेब ही प्रातःप्रार्थना ( महला १ ). तत्पश्चात् गुरु अमरदास ( महला ३ ), गुरु रामदास ( महला ४ ), गुरु अर्जुनदेव ( महला ५ ), गुरु अंगद-देव ( महला २ ) गुरु तेगबहादूर ( महला ६ ) यांची वाणी. दुसरा भाग हा या ग्रंथांतील मुख्य भाग. यांतील कवनांची रचना संगीत पद्धतीनें केलेली आहे. त्यांत ३१ रागांचा समावेश आहे. सकाळ, दुपार, सायंकाळ आणि रात्रीच्या निरनिराळ्या वेळी गातां येणारे सर्व राग तर त्यांत आहेतच. शिवाय वेगवेगळ्या ऋतुला साजेसे रागहि त्यांत दिले आहेत. प्रत्येक रागाच्या प्रथमार्धांत गुरूंच्या वाणीचा क्रम ( १ )

सबद ( शब्द ), ( २ ) असद पदिया ( अष्टपदी ), ( ३ ) छंत ( छंद ), ( ४ ) वार ( कविता ) अशा आहे; व त्या त्या रागांच्या उत्तरार्धात भक्तांची वाणी दिली आहे. या भक्तांची नांवे कालक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहे :—( १ ) जयदेव इ. १२५०, ( २ ) नामदेव ( स. ११९२-१२७२ ), ( ३ ) त्रिलोचन ( जन्म १२७२ इ. ), ( ४ ) परमानन्द, ( ५ ) सदना, ( ६ ) बेनी, ( ७ ) रामानन्द, ( ८ ) धन्नाजाट ( जन्म १४१५ इ. ), ( ९ ) पीपा ( जन्म १४२५ इ. ), ( १० ) सैन, ( ११ ) कबीर ( जन्म इ. १३९८-९९ ), ( १२ ) रैदास, ( १३ ) मीराबाई ( १५०४ इ. ), ( १४ ) फरीद, जातीचे मुसलमान, जन्मस्थान राजस्थान, ( १५ ) भीखन, काकारीचे भीकन, ( १६ ) सूरदास, 'सूरसागरचे' रचनाकार.

शेवटच्या पुरवणी भागांत गुरु नानकांची वाणी, गुरु अर्जुनांचे श्लोक, गुरु अर्जुनाच्या व भाटांनी पहिल्या पांच गुरूंच्या स्तुतिपर रचलेली पदे सवैये छंदांत दिली आहेत.

### आदिग्रंथाची भाषा

गुरुग्रंथांतील भाषा उत्तर भारतांत मोठ्या प्रमाणांत बोलली जात होती. तरीहि ती कमीअधिक प्रमाणांत आर्ष बनलेली आहे. सामान्य जनांची ही हिंदी बोली भाषा अनेक मिश्र भाषा मिळून झालेली आहे. पश्चिम हिंदी, प्राकृत, बृज, पंजाबी, राजस्थानी, मराठी आणि त्या काळांत वाढत्या प्रमाणांत वापरांत असलेले नवे पर्शियन आणि अरबी शब्द, यांची ती आहे. हा ग्रंथ म्हणजे "जुन्या हिंदु बोली भाषेची खाण आहे" असा अभिप्राय डॉ. ट्रंप यांनी एके ठिकाणी व्यक्त केला आहे तो किती खरा आहे याची खात्री हा ग्रंथ वाचल्यावरच पटते. या ग्रंथांतील पदें जेव्हां देवनागरी लिपींत छापली गेली तेव्हां "शब्द के स्थान शब्द" याप्रमाणें त्यांचे रूपांतर झाले. म्हणून या ग्रंथांतील पाठ अधिकृत राहिले आहेत. शिख धर्मातील अनुयायांना काय वाटते ते त्यांच्याच शब्दांत येथें उद्धृत करतो—

"महा पुरुषोंकी तरफसे जो अक्षरोंके जोड़ तोड़ मंत्ररूप दिव्य वाणी में हुआ करते है, उनके मिलाप मे कोई अमोघ शक्ति होती है जिसको हम सर्वसाधारण हमलोग नही समझा सकते। परन्तु उनके पठन-पाठन मे यथातथ्य उच्चारणसेही पूर्ण सिद्धि प्राप्त हो सकती है। इसके सिवाय यह भी कि श्री गुरुग्रंथ साहिबजी के प्रतिशत ८० शब्द ऐसे है जो हिन्दी पाठक ठीक-ठाक समझ सकते है। इस विचार के अनुसार ही यह हिन्दी बीड गुरु मुखी लिखित अनुसार ही रखी गई है। अर्थात् केवल गुरु मुखी अक्षरों के स्थान हिन्दी ( देवनागरी ) अक्षर ही किये है। ( प्रकाशक की विनय, पृष्ठ १, आदी श्री गुरु ग्रंथ साहेबजी-मोहन सिंह वैद्य, तरनतारन ( अमृतसर ) १९२७ ).

या ग्रंथांतील पाठावर पंजाबी भाषेचा प्रभाव दृष्टीस पडत असला तरी १६०४ पूर्वी अस्तित्वांत असलेली हिंदी भाषा व व्याकरण रूपें आजहि मूळच्या स्वरुपांत त्यांत आढळतात. नामदेवांची भाषा मराठी होती. त्या भाषेंतील जुनी रूपे नामदेवांच्या वाणीमध्यें या ग्रंथांत आजहि सुरक्षित आहेत.

**श्री गुरु ग्रंथांत सर्व समान**

श्री गुरु ग्रंथांत ज्या भक्तांच्या कृतींचा समावेश करण्यांत आला आहे ते समाजांतील खालच्या वर्गांतील होते. कबीरदास हे वीणकर होते. नामदेव छिबा ( शिंपी ), रैदास चांभार, सदना कसाई, त्रिलोचन वैश्य व सैन न्हावी होते. या भक्तांत पीपा हाच एक राजा होता व सूरदास ब्राह्मण होता. आदि ग्रंथानुसार सत्याचा साक्षात्कार होण्यासाठीं जातींची महत्ता उपयोगी नाहीं. जात व पंथ यांचीं बंधने उल्लंघून टाकण्याचें आवाहनच या ग्रंथांतील तीव्र व साध्या शब्दांत आहे.

**नामदेवांची कवनें**

आदि ग्रंथाच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागांत एकतीस रागापैकीं १७ राग नामदेवांच्या वाणीत पुढीलप्रमाणे प्रयुक्त आहेत.—

| राग | पदसंख्या | राग | पदसंख्या |
|---|---|---|---|
| गौडीचेती | १ | रामकली | ४ |
| आसावरी | ५ | माली गऊड | ३ |
| गुजरी | २ | मारू | १ |
| सोरठी | ३ | भैरउ | १२ |
| धनासरी | ५ | | |
| टोडी | ३ | सारंगु | ७ |
| तिलंग | २ | मलार | २ |
| बिलावलु | १ | कानडा | १ |
| गोंड | ७ | प्रभाती | २ |
| | | एकूण | ६१ |

आदिग्रंथांत वरीलप्रमाणें नामदेवांची ६१ पदें आहेत. त्यापैकी ८ पदांत नामदेवांचे तरल व्यक्ति-दर्शन घडते. त्याचा विचार एका स्वतंत्र लेखांत केला आहे.

जीवन संबंधित आठ पदाखेरीज बाकीच्या त्रेपन्न पदांच्या अंतरंगाचा विचार करता मराठी अभंगाप्रमाणे त्यांत परमात्म भक्ति आणि नामसाधनेची अंगे नामदेवांनीं भावोत्कट शब्दांत व्यक्त केली आहेत. परमात्म्याशी जवळीक पावलेला त्यांचा आत्मा भोंवतालचा अज्ञानांधकार दूर करण्यासाठी किती उत्कंठित होता, याचे प्रत्यंतरहि त्यांच्या या पदावलीवरून येते.

## आदि ग्रंथेतर पदे

नामदेवांची अशी कित्येक पदें आहेत कीं जी आदि ग्रंथांत व आदि ग्रंथेतर काव्य-संग्रहांत आढळतात. ती अगदी तंतोतंत सारखी नसली तरी त्यांच्या तपशिलांत थोडाफार फरक आढळतो. त्यांची तुलना करून पहावी.

| आदि ग्रंथ | आदि ग्रंथेतर |
| --- | --- |
| काएरे मन बिखीया | काइरे मन विषया |
| भाऊ कलंदर केसवा | आव कलंदर केसवा |
| संडा मरका जाइ | राम राम राम जपिबौ |
| बेसी भूखे प्रीती | नामदेव प्रीती नाराइण |
| आनीले कागद काटीले | ऐसे मनराम नामै |
| नादी भ्रमे जैसे | जैसा मृगा नाद |
| लोभ ल्हरी अति | संसार समुंदे तारि |
| आनीले कुंभ भराइले | जत्र जाऊं तत्र बीठल |
| सुल्तानु पुछे सुनु | आवो मेरे गोविंद |
| पाड पडोसणि पूछीले | नामे कौ स्री |
| सापु कुन्च छोडै | काहे कौ कीजै |
| मोही लागती ताला | पाणिया बिन मीन |
| गहरी करिके नींव | हमारे करता राम |
| धमै घट रामू | राम बोले राम |

वरील कवनांत भाषा व आशय एकच असून मूळांत ( Text ) फरक कां असावा ? याचे कारण असे दिसते कीं कीर्तन प्रसंगी महाराष्ट्रांत, राजस्थानांत, मध्यप्रदेशांत, पंजाबांत व अन्यत्र नामदेवांनीं जे गाईले ते सारे स्मरणांत ठेवून पुढे केव्हांतरी त्यांच्या शिष्यांनीं लिहून काढले. "ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्वा शब्दा। चिदानंद बाबा लिही त्यास" (२७२) या अभंगांत जनाबाईने समकालीन प्रत्येक कवीची नांवे ओवून, त्यांच्या लेखकांची नामावळी दिली आहे. पण नामदेवांचा लेखक कोण हे निश्चयपूर्वक सांगितले नाहीं.

"नामयाचे जनीचा पांडुरंग" असा फक्त निर्वाळा दिला आहे, व तो निवाजनार्दनाने नामदेवाविषयी सत्य मानला आहे. याचा अर्थ नामदेवांच्या काव्य-कृति, प्रेमाने जनतेने कंठी धारण करून जपून ठेवल्या व त्या जनतेच्या मुखांत खेळत राहिल्यानें त्यांजवर त्या बोलींचे न कळत संस्कार झाले, यामुळे वरील पदांत रीतिं, शब्द आणि शिकवण यांत साम्य स्पष्टपणें दिसत असले तरी मूळांत

च फरक असल्याचे दृग्गोचर होते. नानकापूर्वी, पंजाबचे लोक–मानस जेव्हां थेनेला प्रवृत्त होत होते तेव्हां ते स्वभावतःच नामदेवांच्या व कबीरांच्या वाणीचा श्रय घेत होते; आणि त्याकाळी दोन मौखिक परंपरा प्रचलित होत्या. एक पूर्वेकडील परा–ही आदि ग्रंथेतर पदांचा आधार व परंपरा ही गुरुग्रंथांतील पदांचे मूळ. दोनहि परंपरेत आढळणाऱ्या गीतांतून उत्कट भक्तीनें ओसंडणारे हृदय एकच हे व सखोल अनुभूति आणि मानवतेविषयीं उत्कट प्रेम, हा नामदेवांच्या गीतांचा रमाहि या आदि ग्रंथांतील पदांत प्रगट होतो.

नामदेवांच्या ह्या हिंदी गीतांची रचना अनेकदा स्वल्पाक्षर व बव्हर्थी असल्यानें मजण्यास ती कठीण जातात. त्यांतहि साक्षात्कारांतील दिव्य व भास्वर तेजाचा र्श ह्या हिंदी पद्यांत शब्दा शब्दांला जाणवतो. अनुभूती आत्म्यांतील Mystiei‹m ) परिभाषेची ज्यांना माहिती नाहीं अशा वाचकांस **'नांद माइलो'** ( अंतर्यामी अखंड अंतर नादांत सामावून गेलो ), **अनहद सबद** अनहात ध्वनी ), **'ज्योती ज्योती समानी'** ( ज्योती ज्योती समान प्रकाश ), **रतन कमल कोटरी'** ( रत्न कमलाप्रमाणें हृदयाच्या गाभाऱ्यांत ), **'चमत्कार बजलू'** ( विद्युत प्रकाश ), **सरित अंम्रित सरी'** ( हृदयांतील बहात्तर क्यांत ), **'अखंड मंडल'** ( अनंत प्रकाश ), **'निरंकार महि'** ( निराकार देश ), **'इडा पिंगला'** ( डावी व उजवी नाडी ), **'चंदु सुरज'** ( डावा उजवा नेत्र ), **'सुन समाधी'** ( शून्य समाधी ) इत्यादि शास्त्रीय शब्द मजणार नाहींत. तथापि, नामदेवांचा भावस्पर्शी स्वानुभव त्यांत जसा दिसून येतो सेंच हृदयाला हलवून सोडणारे उत्कट गान प्रत्येक पद्यांत पाहावयास सांपडते. यांत अर्थ–माधुर्य जसें आहे तसेंच नादमाधुर्य पण आहे. या हिंदी गीतांत काव्य–गुण ज्याला म्हणतात तेहि उत्कट स्वरुपांत आहेत. नामदेवांची ही काव्य–संपदा पाहिली म्हणजे संत नामदेव केवळ भक्तच नव्हते तर ते मानव धर्माचे थोर उद्गाते व एक महान् सत्कवि होते याची खात्री पटते.

# अरविंदांचा पूर्णयोग आणि दिव्यजीवन

श्री अरविंदांनी अध्यात्मक्षेत्रांतील उत्तुंग हिमालयाचे अत्युच्च शिखर गांठून तेथें अतिमानतत्त्वाचा जो विजयध्वज रोवला, त्यांची क्रांतिकथा विशद करण्यापूर्वी भगवान बुद्धदेव, भगवान शंकराचार्य आणि महात्मा गांधी हे तीन युगपुरुष जगाकडे आणि जगत्कर्त्याकडे कोणत्या दृष्टीनें पहात होते याची सामान्य कल्पना येथें दिल्यास ती प्रस्तुत विषयाचा सोपान चढण्यास अधिक इष्टच होईल आणि अरविंद-विचारांचे प्रभावी अभिनवत्व हृदयाला भिडून वाचकांची पूर्णयोग जिज्ञासेची क्षुधा अधिकच प्रज्वलित होईल असें वाटते.

## जीवन जगत् यांकडे पहाण्याचा युगपुरुषांचा दृष्टिकोन

या दुःखमय जगाकडे बघितल्यामुळें आणि त्याचा कटु अनुभव आल्यानें भगवान् बुद्धदेवांचें करुण हृदय दयार्द्र होऊन त्यांतून अतिशय कळकळीनें 'सर्वं दुःखम् दुःखम्' हे उद्गार बाहेर पडले.

पण श्री अरविंद म्हणतात–"अखिल जगत् आनंदमय आहे. त्याची निर्मिती आनंदापासूनच आहे. सध्यांहि तें आनंदांत आहे आणि आनंदाकडेच त्याची गति आहे. जगाची उत्पत्ती, स्थिति, लय हें सर्वच आनंदमय आहे. जगांत दुःख, दैन्य भरून राहिलें आहे आणि जगाची स्थिति तितकी समाधानकारक नाहीं हें कांहीं खोटें नाहीं. परंतु या वरवर दिसणाऱ्या परिस्थितीच्या अंतरंगांत पाहिलें म्हणजे जगतामध्यें आढळून येणारे दुःख हा आनंदाचाच एक प्रकार आहे हें समजून चुकेल. बाह्यतः तें जरी दुःखमय भासलें तरी वस्तुतः ते आनंदमयच आहे. आनंदाचीच दुःखामध्यें परिणति झालेली आहे, आनंदाचे विकृत स्वरूप ते आहे. प्रकृतीची गति आणि कालाचा ओघ यांच्यामध्यें स्वतः आनंदानेंच दुःखाचें रूप घेतले आहे. परंतु योग-शक्तिद्वारा या दुःखाला त्याचें मूळ रूप देणें, त्याचे आनंदामध्यें रूपांतर करणें सहज शक्य आहे. यासाठीं महान् उद्योग चालू आहे आणि खात्रीने एक दिवस दुःखाचें संपूर्णतः आनंदांत परिवर्तन झालेले आपणांस दिसेल. उद्यां याच दुःखमय जगांत दशदिशांतून आनंदाचें निर्झर वाहूं लागलेले दिसतील. या भूतलावर प्रत्यक्ष स्वर्ग अवतीर्ण होईल आणि नजीकच्याच भविष्यकाळांत हीच दुःखार्त आणि मर्त्य मानवाची पृथ्वी देवतांचें क्रीडांगण बनणार आहे. जगत् चालकाची मंदिरनगरी आनंदपुरी होणार आहे.

तैत्तिरीय उपनिषदाच्या मंत्रमय छन्दांत सांगावयाचें तर "आनंदाद्ध्येव खल्विमानि भूतानि जायन्ते। आनंदेन जातानि जीवन्ति। आनंन्दं प्रयन्त्यभिसंविशन्तीति।" आनंदापासूनच हे जीव उत्पन्न होतात, आनंदांतच जगतात आणि आनंदालाच मिळतात. हा अरविंदांचा जीव आणि जगत् या संबंधीचा दृष्टिकोन आहे.

श्री शंकराचार्य म्हणतात, 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' अर्थात् हा मौलवान् आध्यात्मिक अनुभव आहे. हा अनुभव म्हणजे ईश्वरदत्त देणगी आहे. श्री अरविंद म्हणतात, 'ब्रह्म सत्यं जगत् सत्यं' म्हणजे ब्रह्महि सत्य आहे आणि जगतहि सत्य आहे. जग माया आहे असें शंकराचार्य ठासून सांगतात.

श्री अरविंद म्हणतात—'आध्यात्मिक साधनेमध्यें साधकाला ज्यावेळीं ब्रह्माच्या कूटस्थ, अचल, सत् अशा अवस्थांचा अनुभव येतो त्यावेळीं मायेच्या एका विशेष स्वरूपाची स्पष्ट कल्पना येते. अनुभव येतो. हें जग भ्रम वाटं लागते. या ठिकाणीं जर साधकाची प्रगति खुंटली नाहीं आणि 'परमावस्था ती हीच' अशी चुकीची कल्पना करून न घेतां जर तो अनुभव घेत राहिला, साधना सतत चालू ठेवली तर त्याला याच मायेमध्यें सर्व सारभूत तत्वांची प्रचीति येईल आणि माया नांवाची कांहीं वस्तु अस्तित्वांत नाहीं, हें अखिल एकमात्र ब्रह्म आहे, याबद्दल त्याची निश्चिति होईल.

गीता एके ठिकाणीं म्हणते, 'कर्मांची परिसमाप्ति म्हणजेच 'ज्ञान.' हें भारताच्या मनावर दीर्घकाल आणि खोलवर रुजलें आहे आणि त्याचाच परिणाम आजही दिसून येतो.

परंतु श्री अरविंद याही पुढें जाऊन म्हणतात, 'ज्ञानाची परिपूर्णता' "दिव्य कर्मा"मध्यें होतें. कर्म अविरत चालू रहाण्यासाठीं त्याची पार्श्वभूमि सुसंपन्न, सुसज्जित आणि प्रशांत विशाल अशा ज्ञानानें रंगविली जाते.

जो मनुष्य ईश्वराचें नामस्मरण, कीर्तन, श्रवण करून अत्यानंदित होऊन ज्याच्या डोळ्यांत अश्रू येतात, जो ईश्वरभक्तीनें नाचूं गाऊं लागतो तो खरोखर धन्य होय. तोच खरा देवभक्त असे पुष्कळ लोक म्हणतात आणि जो हें मानवी शरीर धारण करूनही ईश्वराचें नामस्मरण करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर त्याला त्याची आठवणही होत नाहीं त्या अभागी जीवाचा धिःकार असो.

श्री. अरविंद म्हणतात, हें संपूर्ण सत्य नव्हे. जो मनुष्य ईश्वरी प्रेम आणि आनंद मिळाल्यामुळें नाचूं गाऊं लागतो, हंसतो, रडतो तो भक्त असतो खरा; पण या गोष्टीमुळें त्याची शारीरिक दुर्बलताच प्रदर्शित होते. भगवत्प्रेम आणि भगवत्

आनंद धारण करण्याइतकें सामर्थ्य अजून त्याच्या शरीरांत, प्राणांत आणि स्नायुमंडलांत आलेलें नाहीं याची ती खूण असते. आणि म्हणूनच खऱ्या म्हणजेच पूर्ण भक्ताच्या दृष्टीनें आदर्श स्थिति नाहीं. खरा पूर्ण भक्त तोच कीं जो संपूर्ण फुललेल्या कळीप्रमाणें शांत राहून आपल्या स्वाभाविक मंद हास्यानें, आपल्या सौंदर्यानें नि सुगंधानें सर्वांचीं अंतःकरणें आकर्षित करून घेतो आणि त्यांचे अंतरात्मे प्रबुद्ध होऊन परमसत्याभिमुख होतात.

गांधीजी म्हणतात, 'या मानवी देहाच्या सहाय्यानें संपूर्ण सत्याचें दर्शन होणें असंभाव्य आहे.'

परंतु श्री. अरविंद म्हणतात, 'निसर्गमातेनें ह्या मानवी शरीराची रचना केवळ पूर्ण सत्याच्या दर्शनाकरितांच केली आहे, एवढेंच नव्हे तर संपूर्ण सत्याचें आकलन करून घेण्याचें सामर्थ्य फक्त याच शरीराला आहे. याच मानवी शरीरामध्यें सच्चिदानंदाचें पूर्ण रूप व्यक्त होणार आहे आणि केवळ याच हेतूनें मानवी शरीर निर्माण झालेलें आहे.

## श्री अरविंदांची शिकवण

आतां श्री अरविंदांच्या नवप्रवर्तित योगाच्या साध्यसाधनासंबंधीं त्यांचे सर्वसामान्य विचार थोडक्यांत येथें देऊन मग पूर्ण योग आणि दिव्यजीवन यांची मीमांसा अधिक विस्तारानें करूं.

श्री अरविंदांची यौगिक शिकवण ही प्राचीन भारतीय ऋषिवर्यांनीं सांगितलेल्या सत्य ज्ञानावरच आधारलेली आहे. या विश्वातील यच्चयावत् वस्तुमात्रास आधारभूत असें एक अद्वितीय, अव्यक्त, व संविद्रूप, चिद्रूप सत्तत्त्व आहे हा या शिकवणुकीचा मूळ आधार म्हणून एक सिद्धांत आहे. ह्या सत्तत्त्वाची मनुष्याला जाणीव नसते; त्यामुळें स्वतःच्या अस्तित्वाचें भान हें त्याच्या शरीर, प्राण व मन यांशींच संबद्ध असतें; आपण स्वतः त्या सर्वात्मक सत्तत्वापासून विभिन्न आहों, असा त्यास भ्रम झालेला असतो तरी पण कांहीं विशिष्ट प्रकारच्या साधनेच्याद्वारा अंतःकरणशुद्धि करून घेऊन हें अज्ञानावरण दूर करतां येतें. हें आवरण गळून पडतांच आधींची विभिन्नतेची जाणीव मावळून जाते व मग स्वस्वरूप हें त्या सर्वात्म्याशीं एकरूप आहे असा प्रत्यय येतो; स्वस्वरूपाचें असें ज्ञान होतांच सर्वांतर्यामी श्री भगवंतच वास करीत आहे असाही अनुभव येतो.

या जड विश्वाचे ठिकाणीं अंतर्लीन असलेली ती अद्वितीय व संविद्रूप शक्ति या जडभूतांच्या क्रमिक विकसनाच्या द्वारा शेवटीं संपूर्णतया विनिर्मुक्त होते. एका विशिष्ट स्थितीस जडभूतें प्राप्त झालीं म्हणजे मग त्यांच्या ठिकाणीं चेतना

उद्भूत झाल्याचा प्रयत्न येतो. आणि या तऱ्हेनें एकदां कां त्यांच्या ठिकाणीं चैतन्याचा संचार झाला कीं मग उत्तरोत्तर उच्चतर अवस्थेप्रत तें चैतन्य स्वतःच्या अंतःप्रेरणेनें जाऊं लागतें. त्याचबरोबर पूर्णत्वास प्राप्त होण्यासाठीं ते जास्त जास्त व्यापक व विशालहि होत रहतें. या चेतनेचें पहिलें व्यक्त स्वरूप म्हणजे प्राणस्पंदन, 'मन' हें त्यानंतरचें जास्त विकसित असें रूप होय. पण 'मन' या अवस्थेस पोंचल्यावरहि हें क्रमविकसनकार्य थांबत नाहींच; पुढें तें सारखें चालूच रहतें. कारण या मनास अजून आध्यात्मिक व अतिमानसिक रूप प्राप्त व्हावाचें राहिलेलें असतें, आणि तेंहि रूप प्राप्त झाल्यानंतरसुद्धां त्या अतिमानसाचः व आत्मशक्तीचा आणखीहि पुढें जास्त विकास व्हावयाचा असतो. या अखेरीच्या चैतन्यमय सद्मेस आधारभूत असलेली मूळची भगवच्छक्ति त्यांतून व्यक्त व्हावयाची असते. या सीमेस पोंचल्यावरच वस्तुमात्रांत अंतलीन असलेली भगवच्छक्ति पूर्णत्वानें विनिर्मुक्त होऊन मग पुढच्या पूर्णत्वाच्या व्यक्तीकरणाचा मार्ग खुला होतो.

जडप्रकृतीचें क्रमविकसन ज्या भिन्न मिश्र अवस्थांतून होत जातें त्यापैकीं उद्भिज्ज कोटींत आणि पशुकोटींत ती येईपर्यंत तिच्या ठिकाणीं सचेतन इच्छाशक्ति लुप्त असते, व्यक्त नसते. मनुष्यकोटींत मात्र या प्रकृतीस सचेतन इच्छा शक्तीचें रूप येण्याची क्षमता निर्माण झालेली असते. पण मनुष्याच्या ठिकाणीं दिसणारी सामान्य मानस इच्छाशक्ति हें कार्य एकटी पूर्ण करूं शकत नाहीं; कारण हें अविकसित मन जरी शक्तियुक्त असलें तरी कांहीं मर्यादेपर्यंतच कार्यक्षम राहतें व विशिष्ट अवस्थेनंतर मात्र कोणत्यातरी केंद्राभोंवतीं भ्रमण करूं लागतें. याच ठिकाणीं त्या चेतनाशक्तीस अशी गति अथवा वळण देण्याची आवश्यकता असते कीं, त्या योगें मानवी मनोधर्माचें संपूर्ण परिवर्तन घडून त्यास उच्चतर भूमिका प्राप्त झाली पाहिजे. उच्चतर अवस्थेंत तें राहूं लागलें पाहिजे, अशा पद्धतीनें उत्तरोत्तर उच्च अवस्थांतून संक्रमित होत त्यास पूर्णत्वास नेण्याची प्रक्रिया प्राचीन योगमार्गांतील अभ्यास—वैराग्यधिष्ठित साधनमार्गांत खचित सांपडते. पूर्वीं या साधनेसाठीं जगापासून संसारापासून अलग राहून त्या आत्मस्वरूपीं लीन होण्याचा अभ्यास करीत असत.

परंतु श्री अरविंदांची शिकवण वेगळी आहे. त्यांच्या शिकवणुकीप्रमाणें त्या ऊर्ध्वस्थ महत्त्व अंतराळीं सचरून राहिलेलें असतें त्याचें आपल्या ठिकाणीं अवतरण होणें व अंतस्थ ईशशक्तीची पूर्ण मुक्तता होणें या गोष्टी या जगाच्या बाहेरच नव्हे तर याच जगांत राहूनही याच देहांतही अगदीं शक्य आहेत. साधक या साधनेंत जसा अधिकाधिक प्रगति करूं लागतो, तसतसे त्याच्या मनाच्या ठिकाणचें मर्यादित ज्ञान वा अज्ञानपटल हळूहळू दूर होत जाऊन शेवटीं त्या जागीं अतिमानसिक ऋतचैतन्य आविर्भूत होतें; या अंतस्थेस पोंचलेलें हें मन आतां त्या अंतस्थ पुरुषाचे—अंतस्थ

महाशक्तिचें–यथायोग्य साधन बनलेलें असतें. या शुद्ध मनाच्या आधारानें आतां अंतर्जगतांत व बाह्य क्रियाशील जगतांत दोन्ही ठिकाणीं मनुष्यास स्वात्मप्रत्यय येतां येतो; आणि याच मार्गानें पुढें प्रगति होत होत शेवटीं मुळच्या या पाशवीवृत्तीनें परिपूर्ण अशा मानवी प्रकृतीचें अतिक्रमण होतें व तें मन एका दिव्यकोटींत परिणत होतें. रूपांतरित होतें.

हें उद्दिष्ट कांहीं यौगिक मानसिक प्रक्रियांच्या साह्यानें साध्य करून घेणें शक्य असतें. या प्रक्रियेनें साधक हा सर्वांशांनी परिवर्तनास, रूपांतरास सन्मुख होतो. ही परिवर्तनाची क्रिया कशी होते ? अद्यापि अमूर्त असलेलें उच्चतर व ऊर्ध्वस्थ असें जें अतिमानसिक महत्त्व तें साधकाच्या अंगी–सर्वांशांतून संपूर्णतया भिनतें, प्रविष्ट होतें आणि यामुळेंच हें परिवर्तन घडून येत असतें.

अर्थात् हें रूपांतर आकस्मिक किंवा अत्यल्पावधींत किंवा द्रुतगतीनें अथवा अलौकिक रीतीनें यक्षिणीची कांडी फिरल्याप्रमाणें घडून येत नाहीं. या अतिमानसिक महत्त्वाचें अवतरण साधकाच्या ठिकाणीं होण्याची साधकास पात्रता येण्याच्याही आधीं त्या साधकास अनेकविध मनोभूमिकांतून मार्गक्रमण करून जावें लागतें. साधारणतः त्याच्या बहिर्मुख अशा मन, प्राण व शरीर यांच्या आश्रयानेंच जीवन व्यतीत होत असलें तरी त्याच्या ठिकाणीं ती महत्तम अंतरसत्ता सुप्तरूपानें नेहमीं अस्तित्वांत असतेच. फक्त त्याची जाणीव होण्याची मात्र जरूरी असते. कारण प्रस्तुतच्या त्याच्या भूमिकेवर तो असतांना त्या अंतरसत्तेचा प्रभाव मर्यादित प्रमाणांतच त्याच्या अनुभवास येत असतो; पण तेवढा मर्यादित अनुभवही त्या साधकास आणखी उत्तरोत्तर जास्त जास्त महत्तर आणि उच्चतर सौंदर्य, ज्ञान व सामर्थ्य यांची स्वतःस प्राप्ती झाल्याचा त्यास प्रत्यय येतो व आणखी पुढें त्याच मार्गानें प्रगत होण्याच्या तीव्रतर साधनेस जोरानें तो प्रवृत्त होतो.

या यौगिक प्रक्रियेचें प्रथमचें साध्य म्हणजे त्या अंतरसत्तेचे प्रभावक्षेत्र अनावृत्त करणें हेंच असते. यानंतर साधकानें त्या प्रभावक्षेत्रांत प्रतिष्ठित राहून त्या आंतरिक ज्ञान–शक्ति ज्योतिस्थानीय अंतःशक्तीच्या द्वारां आपल्या बाह्य जीवनाचें नियमन नियंत्रण करावयाचें असतें. ही प्रक्रिया जशी पूर्णतेस जाऊं लागते. तसतसें साधकास अंतर्यामी भिन्न भिन्न साक्षात्कार–प्रत्यय येऊं लागतात. यापुढें उत्तरोत्तर साधकास आत्मा हा वस्तुतः मन–प्राण–देहाच्या मूलतत्वांच्या संयोगाचें विपरिणत रूप नाहीं, अद्वितीय दिव्य अग्नीचा तो एक तेजस्वी स्फुल्लिंग म्हणजेच आत्मा होय, आणि तोच आत्मा आपल्या ठिकाणीं व्याप्त आहे असा प्रत्यय येत जातो.

यानंतर त्या अंतस्थ आत्म्याच्या–पुरुषाच्या ठिकाणीं तद्रूपत्वानें स्थिर राहण्यास

त्याच्या ठिकाणीं आपलें मन प्रविष्ट करण्यास साधकानें शिकावयाचें असतें. त्या सत्याभिमुख अंतःपुरुषाच्या ठिकाणीं सत्यवर्ती असा महातीव्र प्रवेग असतो. त्या प्रवेगाच्या साह्यानें आतां आपल्या प्राकृतिक अवशिष्ट अंशास साधकानें शुद्ध करून घेऊन पुढील लक्ष्यावर एकचित्त होऊन रहावयाचें असते. यानंतर मग ऊर्ध्वमुखद्वार उघडलें जाते व ऊर्ध्वस्थित भगवत्तत्वाचे तद्द्वारा साधकाचे ठिकाणीं रोमरोमी अवतरण होणें सुलभ व अशक्य होते. तरीपण यावेळींसुद्धां त्या अति मानसिक ज्योतीचा व शक्तीचा पूर्णत्वानें आविष्कार शक्य नसतोच. कारण मानुषी मन हें अतिमानसिक अशा ऋतचेतनात्मक अवस्थेंत संक्रमिक होण्याच्या मार्गातील मध्यंतरांतलि अनेकविध भूमिकांचे उद्भेदन करून त्यांतून पार व्हावयाचें असते. या प्रत्येक माध्यमिक भूमिकेप्रत आल्यावर तत्तद्विशिष्ट शक्ती साधकाच्या मनप्राण देहादिकांत प्रविष्ट व्हायची असते. अशा रीतीनें सर्व भूमिकांचे उल्लंघन केल्या. नंतरच ते ऋतचैतन्य पूर्णांशानें प्राकृत स्वभावाच्या ठिकाणींहि कार्यक्षम होऊं शकतें. अर्थात त्यामुळेंच ही आत्मानुशीलनाची प्रक्रिया किंवा हा साधनमार्ग सुदीर्घ व दुराराध्य असा असतो. तथापि या मार्गांत अत्यल्पाहि गति प्राप्त झाली तरी तो मोठाच लाभ असतो. कारण त्यायोगें त्या अंतिम मुक्तीचा संभव प्राप्त होऊन सिद्धीचे आपण योग्य अधिकारी तरी खास बनतोंच.

पुरातन योगपद्धतींत अशा कांहीं गोष्टी आहेत कीं, ज्यांची आपल्या मार्गांत आपणास आवश्यकता असते. उदाहरणार्थ, मन उत्तरोत्तर अधिकाधिक व्यापकतेच्या भूमिकेवर आरूढ करणें, त्यास स्वात्मप्रत्ययास अभिमुख करणें, आपल्या अनंतत्वाची अनुभूति घेण्यास उत्तरोत्तर पात्र बनविणें, तसेंच जगच्चैतन्यभावांत लीन-स्थिर राहणें, वासना व विकार यांवर विजय मिळविणें; या दृष्टीनें बाह्य तपाचरण महत्त्वाचें अगर आवश्यक मानतां येत नाहीं; मुख्यतः कामना, आसक्ति, शरीर व त्याच्या आश्रयानें उद्भूत होणारी लोलुपता, अनेकविध गरजा, सामान्य मनःप्रवृत्ति या सर्वांवर संपूर्ण विजय मिळविणें हाच तपाचरणाचा प्रधान अर्थ आहे.

श्री अरविंदप्रणीत योगप्रक्रियेंत प्राचीन अनेकविध योगपद्धतीचे सुसंवादी संमेलन आहे. बुद्धिनिष्ठ ज्ञानमार्गाप्रमाणें मनानें आत्मानात्मविवेक करणें, अंतःकरणनिष्ठ भक्तिमार्गाप्रमाणें प्रेम, भक्ति व समर्पणभाव साधणें, कर्ममार्गाप्रमाणें स्वार्थाधिष्ठित इच्छा व क्षुद्रवासना दूर करून त्यांना सत्याभिमुख करणें, तसेंच त्यांना अहंविशिष्ट भावनेपासून सोडवून त्यापेक्षां उच्चतर अशा सत्यसत्येच्या सेवेस लावणें या सर्वांचा सुमधुर संगम या श्री अरविंदप्रणीत ‘ सर्वांगीण योगांत ’ सांपडतो.

मानवी मनाच्या सर्वांशांना अभ्यास-वैराग्यानें अशी पात्रता आणावयाची असते कीं, जेव्हां केव्हां त्या महत्तर ज्योतीचे व शक्तीचें स्वतःच्या ठिकाणीं

अवतरण होण्याची दिव्य सोन्याची संधि येईल—वेळ येईल, त्यावेळीं आपले मन उत्तेजित—उल्हासित आणि उत्साही होऊन त्या अवस्थांतरास अनुरूप भाव धारण करून राहील आणि नंतर त्या दिव्य, तेजस्वी भगवच्छक्तीचा व दैवी शक्तीचा प्रवाहस्रोत आपल्या सर्वांगांत सहस्रधारांनीं, खुलेपणानें, अप्रतिहतपणे येऊ देईल; त्या प्रवाहास आपणामध्यें पूर्णत्वानें तुडुंब भरूं देईल आणि शेवटीं ही पूर्णत्वानें रूपांतरीत होऊन जाईल. अशी पात्रता मिळविली कीं पुढील सर्व क्रिया दिव्य घटना आपोआप एकामागून एक घडून जातात. साधनेच्या आश्रयानें आपण स्वतःस त्या दिव्य जीवनास सत्पात्र बनवून घ्यायचे असतें—त्याच्या स्वतःच्या प्रयत्नावर त्यानें हें करावयाचें असतें. अवस्थांतर होणें हें कांहीं त्याच्या हातीं नसून भगवत् शक्तीच तें घडवून आणिते.

[ पुढील अंकीं समाप्त


## " साई भक्तांस अमूल्य संधी "

श्री साईलीला १९५८ ( त्रैमासिक ) एप्रिल ते १९५९ जानेवारी १९५९ ( मासिक ) एप्रिलपासून १९६५ मार्चपर्यंतचे, थोडे जुने अंक ( विशेष अंकासह ) शिल्लक असून, ते विक्रीस काढले आहेत. फुटकळ अंकास, ( विशेष अंकासह ) प्रत्येकीं दोन आणे २. पोष्टेज निराळें. ( एक अंकासाठी पोष्टेज १० पैसे, ) ( दोन अंकास १५ पैसे, ) ( तीन अंकास २० पैसे. ) ( चार अंकास २५ पैसे. ) वरीलप्रमाणें जुन्या अंकासाठी—किंमत टपाल खर्चासह ( स्टँप-तिकिट ) अगर मनी ऑर्डरनें पाठवावी.

संपादक

श्री साईलीला मासिक

# भागवत ग्रंथाचें महात्म्य

—गुरुदेव रानडे

62

' भागवत ' म्हणजे प्राचीन अनुभूतिशास्त्राचे भांडारगृहच होय.

महाभारतकालीं प्रचलीत असलेल्या व पुढें केवळ सांप्रदायिक रूप धारण करून आपलींच मतें श्रेष्ठ मानणाऱ्या वैष्णव व शैव मतांचा येथवर विचार झाला. श्रीमद्भागवत, नारदभक्तिसूत्रें व शांडिल्यभक्तिसूत्रें या तीन ग्रंथांत प्रतिपादिलेल्या पूर्ण अनुभूतिशास्त्राचा आतां आपण विचार करूं. या ग्रंथांत प्रतीत होणारी अनुभूति-विषयक विचाराची वाढ वर वर्णिलेल्या तंत्रशास्त्राशी व पुढें प्रतिपाद्य अशा सुसंघटित व तर्कशुद्ध तात्त्विक दर्शनांशीं बहुतेक समकालीन असावी असें दिसतें. रामानुज व मध्वाचार्य यांच्या दर्शनांवर भागवत धर्मांचा परिणाम झाला होता, हें उघड आहे. या दर्शन-कारांच्या काळीं श्रीमद्भागवत हा ग्रंथ इतका लोकादरास पात्र झाला होता कीं, तो एक प्रमाणग्रंथ मानण्यांत येऊं लागला. या ग्रंथभांडारांत अतिप्राचीन काळच्या अनेक श्रेष्ठ आत्मज्ञांसंबंधीं माहिती दिली आहे. या ग्रथांतील भाषा कांहीं ठिकाणी थोडीशी अर्वाचीन असली तरी त्यांत आर्ष भाषापद्धत बरीच वापरली आहे. यावरून हा ग्रंथ ख्रिस्ती शकाच्या पहिल्या कांहीं शतकांत लिहिला असावा, असें दिसतें. या सर्व आधारावरून हा ग्रंथ ख्रिस्ती शकाच्या बाराव्या शतकांत लिहिला असावा, असें जें कांहीं लेखकांचें मत आहे तें अगदीं निराधार व म्हणून अशक्य ठरतें. तत्त्वज्ञानविषयक विचाराच्या वाढीस नुसती सुरुवात झाली असेल—नसेल अशा प्राचीन काळीं हा ग्रंथ लिहिला असावा. पुढें बऱ्याच कालानंतर त्या तात्त्विक विचारास मूर्त स्वरूप देण्याच्या कामीं या ग्रंथांचा उपयोग झाला असावा, हें उघड आहे. या भागवत ग्रंथांत अनेक प्रकारच्या आत्मज्ञांचें वर्णन सांपडतें. त्यांच्या विचारांचा परिणाम पुढील सर्व विचारप्रणालिकांवर झाला. येथें उदाहरण म्हणून कांहीं आत्मज्ञांचें थोडक्यात वर्णन देऊं. ध्रुव हा बाळ राजपुत्र होता. त्याच्या सावत्र आईनें त्याचा अपमान केल्यामुळें त्यानें राज्याचा व जगाचा त्याग केला. अपमान-दुःख असह्य झाल्यामुळें तो स्वतंत्र राज्य मिळविण्यासाठीं तपश्चर्या करण्यास रानांत गेला. तेथें त्याला नारदमुनि सद्गुरु भेटले व त्यांनीं त्यास परमेश्वरप्राप्तीचा मार्ग समजावून सांगितला. शेवटीं त्यास परमेश्वराचें सानुभाव ज्ञान प्राप्त झालें व अढळपद मिळवितां आलें.

प्रल्हाद हा एक राक्षस राजाचा मुलगा होता. त्यास अनेक आपत्ती भोगाव्या लागल्या तरी त्याचें ईश्वरावरील तीव्र प्रेम अभंग व अढळ राहिलें. त्याचा शाळेंतील ओनामा म्हणजे भक्तीचा ओनामा होता. त्यास वाटत असलेल्या ईश्वरविषयक निष्ठेची परीक्षा पाहण्यासाठीं त्याला अग्नींत टाकिलें, उंच कड्यावरून ढकललें, उकळणाऱ्या तेलाच्या कढईंत टाकिलें, तरी ईश्वरी कृपेमुळें या सर्व संकटांतून तो यत्किंचितहि त्रास न होतां पार पडला. प्रल्हाद म्हणजे शुद्ध व निरपेक्ष अशा ईश्वरभक्तीचें दुसरें उदाहरण होय. ईश्वराचें प्रत्यक्ष दर्शन जेव्हां घडतें तेव्हां तो म्हणतो, “मी तुझा निष्काम भक्त आहें व तूं निःस्वार्थी धनी आहेस. मला वर देण्याची तुझी इच्छाच असली तर माझ्या अंतःकरणांत कोणत्याहि प्रकारची वासना उत्पन्न होणार नाहीं, असा वर दे.” उद्धव—हा ईश्वराचा मित्र. त्याचें ईश्वरावरील निरतिशय प्रेम काळाच्या व तात्त्विक विचारमालेच्या कसोटीस पूर्णपणें उतरलें. कुब्जा ही एक कुरूप नायकीण होती. तिचें कृष्णावरील प्रेम विषयी होतें. परंतु, त्याचें शुद्ध व दैवी प्रेमांत रूपांतर होऊन ती देवाची प्रियकरीण बनली. समुद्रांतील प्रचंड नक्रानें पाय धरिला असतां गजेंद्रानें आर्त स्वरानें परमेश्वराचा धांवा केला व परमेश्वर त्याच्या मदतीस धांवून गेला. यावरून एकनिष्ठ भक्ति केल्यानें पशूंचीसुद्धां संकटांतून सुटका होते व देव त्यांच्या आपत्तीच्या वेळीं त्यांच्या मदतीस धांवून जातो ही गोष्ट सिद्ध होते. सुदामा हा एक अत्यंत दरिद्री भक्त होता. ईश्वराला देण्यास त्याच्याजवळ मूठभर पोह्यांशिवाय दुसरें कांहींच नव्हतें. परंतु, तेवढ्यावरच संतुष्ट होऊन श्रीकृष्णानें त्यास सुवर्णनगरीचा राजा केला. अजामीळ हा एक नितान्त पापी ब्राह्मण होता. तो एका चांडाळिणीशीं पूर्ण विषयासक्त झाला असला, तरी अंतकाळीं नारायणाचें नांव घेतल्यामुळे तो मुक्त झाला.

अजगर ऋषि हा एक पूर्ण निष्क्रिय व संतुष्ट असा साधु होता. तो अज्ञातपणें सर्वांची सेवा करी. हे गुण तो साप व मधमाशी यांना मोक्ष—गुरु मानून त्यांच्यापासून शिकला. भागवतांत दिलेली ऋषभ—देवीची माहिती फारच मनोरंजक आहे. हा एक नवीन तऱ्हेचा आत्मज्ञ होता. स्वदेहाविषयीं पूर्ण बेफिकीरी हें त्याच्या आत्मज्ञानाचें विशेष चिन्ह होतें. पृथ्वीचें राज्य आपला मुलगा भरत याजवर सोंपवून या ऋषीनें जगापासून पूर्ण अलिप्त राहावयाचें ठरविलें. तो एखाद्या आंधळ्या, बहिऱ्या व मुक्या माणसाप्रमाणें राहात असे. शहरांत व खेड्यांत, खाणींत व बागेंत, पर्वतशिखरावर व अरण्यांत, तो सारख्याच आनंदांत भटकत राही. लोकांनीं त्याचा कितीहि अपमान केला, तरी त्याची त्यास पर्वा नसे, म्हणून लोक त्याच्या अंगावर दगड व शेण फेकीत, त्याच्या शरीरावर लघुशंका करीत, व त्यास सर्व प्रकारें त्रास देत. इतका अपमान व त्रास झाला तरी त्याचा चेहरा तेजःपुंज व शरीर सुदृढ व निरोगी असे. त्याचे दंड पिळदार व जोरकस असत. त्याच्या चेहऱ्यावरील हास्यानें तर राजघराण्यांतल्या स्त्रिया त्याच्यावर बेहद्द खूष होत. देहाविषयीं पूर्ण उदास असल्यामुळें तो जेवी त्याच ठिकाणीं मलविसर्जन करी. तरी त्याच्या मलास

इतकी सुगंधी असे कीं, सभोंवतालचा दहा मैल प्रदेश त्या सुवासानें दरवळून जाई. उपनिषदांत सांगितलेल्या उत्तरोत्तर चढत्या प्रमाणांत मिळणाऱ्या सर्व आनंदांचा तो भोक्ता होता. शेवटीं आपला देह टाकून देण्याचें ऋषभदेवानें ठरविलें. सूक्ष्म लिंगदेहास स्थूल देहांतून जाऊं दिल्यावर तो एकाकी, दिगंबर व वेड्याप्रमाणें कर्नाटक व इतर प्रांतांत हिंडत असतां, बांबूच्या झाडांचें एकमेकांवर घर्षण होऊन पेटलेल्या वणव्यांत तो सांपडला. तेव्हां त्या अग्निदेवास आहुति म्हणून त्यानें आपला देह अर्पण केला. अवधूत हा आणखी एक निराळ्या प्रकारचा आत्मज्ञ होता. तो आपल्या चोवीस गुरूंपासून निरनिराळे सद्‌गुण शिकला. पृथ्वीपासून सहनशीलता, अग्नीपासून तेजाळपणा, समुद्रापासून अगाधपणा, अरण्यापासून एकांत इत्यादि गुण त्यानें संपादिले. शेवटीं त्यानें आपल्या अद्वितीय आयुष्यक्रमांत या सर्व सद्‌गुणांचा समन्वय केला. ज्याच्या मुखांतून भागवतांतील सर्व तात्त्विक व आध्यात्मिक विचार प्रगट झाले, तो शुकमुनीही एक श्रेष्ठ प्रतीचा आत्मज्ञ होता. आपण प्रतिपादिलेल्या तत्त्वांप्रमाणे तो स्वतः वागे. त्याच्या अनुभूतीचे उद्‌गार म्हणजेच श्रीमद्भगवत ग्रंथ होय. भागवताच्या दहाव्या स्कंदांतील ८७ व्या अध्यायांत त्यानें आपल्या शिकवणीचें सार दिलें आहे. खऱ्या परमार्थांत सद्‌गुरु, भक्ति व सत्संग यांची अत्यंत आवश्यकता आहे, असें शुक्राचार्यांचें मत आहे. भागवत ग्रंथाच्या दहाव्या व अकराव्या स्कंदांचा नायक श्रीकृष्ण हाहि स्वतंत्र परंतु सारखेच उपयुक्त मार्ग आहेत, असे कित्येकांचें मत आहे, तर ज्ञान हें भक्तीचें साधन आहे हें तिसरें मत होय व या मताचाच नारद ऋषींनीं पुरस्कार केला आहे. त्यांच्या मतें भक्ति हें सर्व ज्ञानाचेंच नव्हे, तर सर्व कर्मांचें व सर्व योगांचें अंतिम ध्येय आहे. वस्तुतः भक्ति हें स्वतंत्र ध्येय आहे असेंच मानिलें पाहिजे. भक्ति ही साकार देवावर अधिष्ठित आहे. नम्र लोक देवास आवडतात व गर्विष्ठ लोकांचा तो द्वेष करितो. भक्तींत वर्ग, शिक्षण, कुल, संपत्ति, किंवा कर्म यांचा भेद मुळींच संभवत नाहीं. (२) यानंतर भक्ति प्राप्त करून घेण्याचीं साधनें कोणतीं याचा विचार या सूत्रांत केला आहे. नारदांच्या मतें खऱ्या भक्ताच्या ठिकाणीं कोणते नैतिक गुण अवश्य असावे लागतात ? प्रथम त्यानें सर्व सुखांचा त्याग केला पाहिजे. एक निमिषही न दवडतां सतत एकसारखें ईश्वराचें ध्यान केलें पाहिजे व ईश्वराचे गुणानुवाद ऐकले पाहिजेत. त्यानें भक्तिशास्त्राचा अभ्यास करावा व वायां एक शब्दहि बोलूं नये. संतांची व ईश्वराची करुणा भाकावी, म्हणजे ईश्वर योग्य वेळीं त्यास आत्मानुभवाचा आनंद देईल. नारद ऋषींच्या मतें हा आनंद ईश्वरी कृपेनेंच मिळतो. सज्जनांची सेवा करण्यांत भक्तानें आपलें आयुष्य घालवावें. एकांतवास पत्करावा व योगक्षेमाची काळजी वाहूं नये. धनाचा विचारहि करूं नये. ढोंग व गर्व दुर्गंधी मलाप्रमाणें टाळावें. अहिंसा, सत्य, पावित्र्य, दया व ईश्वरनिष्ठा इत्यादि गुणांचा विकास आपल्या अंतःकरणांत करावा. उपजत मनोवृत्तींचें स्वरूप पूर्णपणें बदलून त्यांना दैवी रूप देण्याचा दीर्घ प्रयत्न व काम, क्रोध व अहंकार यांचें याप्रमाणें

रूप पालटून त्यांचा उपयोग ईश्वरसेवेकडे करावा. वस्तुतः भक्ताच्या सर्वच नैसर्गिक प्रवृत्ती दैवी झाल्याच पाहिजेत. त्यानें वादविवाद कधींच करू नये. कारण वादाला अंत नाहीं. तो बहुविध अनिर्बंध आहे. भक्तानें दुसऱ्याच्या निंदेकडे लक्ष देऊं नये व ध्यान करीत असतां कोणतीहि चिंता बाळगूं नये. (४) यानंतर नारदभक्तिसूत्रांत भक्तीचे प्रकार किती आहेत यांचें विवेचन केलें आहे. प्रथम, सात्त्विक, राजस व तामस असे भक्तीचे तीन प्रकार वर्णिले आहेत. भगवद्गीतेंत सांगितलेलें भक्तांची आर्त, जिज्ञासू व अर्थार्थी हें वर्गीकरण मान्य करून, त्या आधारावर आर्तांची भक्ति सात्त्विक, जिज्ञासूंची राजस व अर्थार्थींची भक्ति तामस असते, असें नारदऋषींनीं सांगितलें आहे. पहिला भक्त दुसऱ्यापेक्षां व दुसरा तिसऱ्या भक्तापेक्षां श्रेष्ठ आहे, असें प्रतिपादिलें आहे. आर्तांची भक्ति जिज्ञासूंच्या भक्तीपेक्षां श्रेष्ठ कां मानावी हें समजणें कठीण आहे. जिज्ञासूंची भक्ति सात्त्विक व आर्तांची भक्ति राजस कां मानूं नये ? या प्रश्नास नारदांना कांहींच उत्तर देतां येत नाहीं. नारद ऋषींनीं भक्तीचें पुनः दुसऱ्या प्रकारें वर्गीकरण केलें आहे. भक्ति एकादशविध (अकरा प्रकाराची) आहे असें या सूत्रकाराचें म्हणणें आहे. ईश्वराचें गुणकीर्तन, त्याच्या स्वरूपदर्शनाची इच्छा, ईश्वरमूर्तीची पूजा, त्याचें ध्यान, ईश्वराची सेवा, ईश्वराशीं सख्य, ईश्वरावर प्रेम, पतीप्रमाणें ईश्वरावर भक्ति, आत्मनिवेदन, परमेश्वराशीं ऐक्य व परमेश्वर-विरहाचें दुःख असे भक्तीचे अकरा प्रकार आहेत. (५) भक्ति स्वयंप्रमाण आहे असें भक्तिप्रामाण्याविषयीं नारद ऋषींचें मत आहे. पूर्ण शांति व पूर्ण सुख हीं तिचीं लक्षणें आहेत. भक्तीचें व्यवहार्य लक्षण म्हणजे अनुभूति होय. ही अनुभूति क्षणोक्षणीं वाढत राहिली पाहिजे. हा अनुभव कायम असावा व तो सूक्ष्म पण असावा. प्रेमानें कंठ दाटून यावा, अंगावर रोमांच उठावे, ध्यानमग्न डोळ्यांतून अश्रुधारा वहाव्या-हीं भक्तीचा शारीरिक व मानसिक लक्षणें होत. अनुभव प्राप्त झाल्यानें जेव्हां पूर्ण आनंद व शांतीचा लाभ होतो, व वर निर्दिष्ट केलेले सर्व शारीरिक व मानसिक परिणाम अनुभवास येतात, तेव्हांच खरी भक्ति उत्पन्न होते. हींच खऱ्या भक्तीचीं प्रमाणभूत लक्षणें होत. (६) शेवटीं, नारदभक्तिसूत्रांत भक्तीचे परिणाम कोणते हें सांगितलें आहे. भक्तीमुळेंच पूर्ण समाधान होतें. भक्तीनें सर्व वासनांचा नाश होतो. भक्त स्वतःचा व इतरांचाहि उद्धार करितो. तो कशाचाहि शोक करीत नाहीं. कोणाचाहि द्वेष करीत नाहीं. इतर गोष्टींत त्याला आनंद व उत्साह वाटत नाहीं. तो प्रेमानें बेहोष होतो व शांत राहतो. अध्यात्मिक स्थिरता ( Spiritual epoch ) हें संतांचें मुख्य लक्षण आहे.

# भागवत धर्माचें स्वरूप

* *****************************

—न्या. मू. माधवराव रानडे

न्या. मू. माधवराव रानडे यांनीं भागवत धर्माचा सखोल अभ्यास करून त्या विषयावर कांहीं व्याख्यानें दिलीं. भक्तिमार्गाचें स्वरूप सर्वांना कळावें हा त्या व्याख्यानांचा मूलभूत उद्देश त्या काळांत त्यांच्या व्याख्यानांनीं जसें मार्गदर्शन केलें त्याचप्रमाणें आजही त्यांचे विचार सर्वांना मार्गदर्शक होऊन रहाणारे आहेत.

ज्या शास्त्रीय रीतीप्रमाणें कोणत्याही विषयाचें स्वरूप कथन करावयाचें म्हटलें म्हणजे तें अन्वयव्यतिरेकाच्या दृष्टीनें केलें पाहिजे. म्हणजे त्या विषयाचें इतर तशाच प्रकारच्या विषयांशीं कोणत्या गोष्टींत साम्य, अथवा सादृश्य आहे आणि कोणत्या गोष्टींत असाम्य किंवा भेद आहे हें सांगितलें पाहिजे. यासारखा कोणत्याही विषयाचें स्वरूप समजण्याला चांगला मार्ग नाहीं; व म्हणून याच रीतीस अनुसरून गेल्या चार व्याख्यानांत एकनाथी भागवतांतील ज्या चार वेंच्यांच्या आधारानें भाषण केलें त्यांमध्यें भक्तिमार्गाचें योग, ज्ञान व कर्म या तीन मार्गांशीं साम्य किती आहे आणि भेद कोठें आहे आणि कोणत्या प्रकारचा आहे हें सांगितलें.

भावानें किंवा कर्मानें अथवा योगानेंच भगवत्प्राप्ति होते असें मानणारे लोक सर्व देशांत आणि सर्व धर्मांत आहेत; परंतु इतर देशांत एकच तऱ्हेची मोडणी आहे. आणि या देशांत सर्व तऱ्हेची मोडणी आहे. आतां भागवतधर्मामध्यें जें भजन सांगितलें आहे तें कोणतें व ह्याचें खरें लक्षण काय हा प्रश्न निघतो, त्याचा एकनाथ-महाराजांनीं ज्या ओंव्यांत उलगडा केला आहे त्यांचा आज विचार करूं या.

हैतुक अथवा अहैतुक। वैदिक लौकिक स्वाभाविक ॥
भगवंतीं अर्पे सकळिक। या नांव देख भागवतधर्म ॥ १ ॥

हेतु धरून जीं जीं कर्में तुम्ही करितां, अथवा कोणत्याही फलप्राप्तीचा हेतु मनांत नसतां जीं कर्में करितां किंवा वैदिक म्हणजे श्रुतिस्मृतिआदिकरून कर्ममार्गांत सांगितलेलीं, लौकिक, म्हणजे लोकाचारांचीं कर्में, किंवा खाणें, पिणें वगैरे जीं स्वाभाविक कर्में, तुम्हीं करितां, तीं सर्व तुम्ही करा. मात्र हीं कर्में सहेतुक असोत वा हेतुरहित असोत, तीं सर्व तुम्ही परमेश्वराला अर्पण करा असा उपदेश आहे. याच्या पुढच्या

बाधूं न शके स्वधर्मकर्म। ऐक राया त्याचें वर्म ॥
मनीं प्रगटला पुरुषोत्तम। अति निःसीम निजबोधें ॥ १ ॥

या ओंवींत पाहिल्या ओंवीचाच विस्तार आहे व भक्तिमार्गाचा अधिकार सर्वांस आहे हें प्रतिपादन ज्या ओंव्यांत एकनाथमहाराजांनीं केलें आहे त्यांपैकीं तिसरीचें पुनरुच्चारण आहे.

आतां कोणी असा आक्षेप घेतील कीं, कर्ममार्गांत जितकीं म्हणून कांहीं कर्मे सांगितलीं आहेत तीं सर्व परमेश्वरालाच अर्पण करण्यांत येतात; कारण, त्यांच्या प्रारंभी परमेश्वराला उद्देशून संकल्प होत असतो आणि समाप्ति झाली म्हणजे मग तीं जनार्दनस्वरूपीं वासुदेवालाच अर्पण करण्यांत येतात. तर मग अर्पण करावयाचें तें आणखी काय राहिलें ? त्यावर भक्तिमार्गातील अर्पण निराळ्या प्रकारचें आहे असें दाखावण्यासाठीं एकनाथमहाराज म्हणतात,

**जंव दृष्टी देखे दृश्यातें । तंव देवाचि देखे तेथें ॥**
**यापरी दर्शनातें । अर्पी भजन सत्ते दृष्टीचा विषयो ॥ १ ॥**

आपण जेवढें कांहीं डोळ्यांनीं पाहतों त्या सर्व दृष्य विषयांत देव आहे, माता म्हणून आहे, पिता म्हणून आहे, कर्ता म्हणून आहे, असें आम्हीं पाहावें. मोठ्या नदीच्या तीरीं, उच्च पर्वतावर, अथवा इतर ठिकाणीं गेलों असतां परमेश्वराच्या दयेचा, चातुर्याचा आणि शक्तीचा भास आम्हांस असा झाला पाहिजे कीं, जो जो विषय आपल्या दृष्टीस गोचर होतो त्यांत देव आहे अशी मनाची वृत्ति होऊन जावी व डोळ्यांचें प्रत्येक पहाणें देवमय होऊन जावें.

हें भागवतधर्माचें अनुशासन दृष्टीला झालें. आणि हेंच भागवतधर्मानुयायांचें दृष्टीच्या संबधानें कर्तव्य होय.

हे दृष्टीच्या संबंधानें सांगितलें. तद्वतच श्रवणाचाही प्रकार आहे.

**श्रवणेंचि यापरि श्रवण । करितां उठिलें ब्रह्मार्पण ॥**
**हेतुरहित भगवद्भजन । स्वभावें जाण स्वयें होतें ॥ १ ॥**

ध्वनि कानांत पडला असतां, ज्याप्रमाणें दृष्टीनें देवाचा बोध व्हावा त्याप्रमाणें ध्वनींतसुद्धां ब्रह्मार्पण उठावें, म्हणजे तो ध्वनि ब्रह्मार्पण होत आहे, अथवा भगवंताची साक्ष आहे असें वाटावें. कीर्तनाचे व भजनाचे प्रसंगीं सारंगी, मृदंग इत्यादि वाजविण्यांत जें चित्त, ज्या मनोवृत्ति सैरावैरा धांवत असतात त्यांची एकाग्रता करण्याचा हेतु असतो; म्हणजे इतर गोष्टींकडे लक्ष न जातां तें भजनाकडे लागावें, हाच मुख्य हेतु असतो. परंतु भजनाविषयीं एकतानता व्हावी तें एकीकडचे राहून नाद व ताल यांतच पुष्कळ वेळ मनुष्य गढून जातो. म्हणून सर्वांत उत्तम उपाय म्हटला म्हणजे कानांत सर्व ध्वनींत ब्रह्मबोधाची संवय लावावी हा होय. कीर्तनांत रंग उठत नाही असें पुष्कळ लोक म्हणतांना आपण ऐकतों. यांत कांहीं दोष श्रोत्याचा आहे आणि कांहीं दोष वक्त्याचा आहे. कीर्तनकारास सारंगी, मृदंग इत्यादि साहित्याची आवश्यकता वाटावी, आणि श्रोत्यास कीर्तनांत रंग उठला नाही असें वाटावें, यावरून दोघांच्याही श्रवणास ब्रह्मबोधाची संवय नाहीं असेंच अनुमान होतें. श्रवणाला ब्रह्मबोधाची संवय लागली

म्हणजे सर्वत्र एकाग्रता होते, व प्रत्येक ध्वनि परमेश्वराची आठवण देतो. तसाच प्रकार घ्राणेंद्रियाचाही असला पाहिजे. हे पुढील ओंवीवरून दिसून येईल.

जो सुमना सुमनपण जोडी । तो घ्राणाचे घ्राण होय आवडी ॥
मग नाना सुवास परवडी । ब्रह्मार्पण मोडी निजभोग अर्पी ॥ १ ॥

पूजेच्या ठिकाणीं दीप, घंटा, कापूर, धूप, फुलें वगैरे कां असतात ? चक्षूंना, श्रवणांना, घ्राणाला संतोष वाटून परमेश्वराच्या ठिकाणीं तल्लीनता यावी म्हणून. परंतु कर्ममार्गामध्यें वरील उपकरणांसच प्राधान्य प्राप्त झाल्यामुळें व त्यांवरच सर्व लक्ष जात असल्यामुळें जडता उत्पन्न होऊन मूळचा हेतु व्यर्थ जातो. ज्या परमेश्वराच्या कृपेनें पुष्पास सुगंध प्राप्त झाला, त्याची सूचना जर प्रत्येक गंधापासून घ्राणास होऊं लागली, तरच तें घ्राणाच्या संबंधानें भागवतधर्मानुयायांचें कर्तव्य झालें.

आतां चौथें इंद्रिय रसना तिचा विचार करूं.

रसना रस घेऊं जाय । तंव रसास्वाद देवचि होय ॥
मग रसनेमाजी येऊनि राहे । ब्रह्मार्पण पाहे रसभोगवृत्ती ॥ २ ॥

रसना म्हणजे जिव्हा, प्रत्येक रसाचा स्वाद घेत असतां परमेश्वराच्या कृपेनें हा स्वाद मिळाला अशी जर रसनेस सूचना होऊं लागली, तर रसोपभोगाची लोलुपता नाहींशी होऊन भगवच्चिंतनाविषयीं एकाग्रता प्राप्त होते. रसस्वाद घ्या; श्रवण करा; दृष्टिसुख घ्या; परंतु त्या त्या इंद्रियाचा विषय देव करून घ्या. त्या त्या इंद्रियानें दृष्टिसुखाचा, श्रवणसुखाचा व रसस्वादाचा दाता जो परमेश्वर त्याला ओळखा, म्हणजे तुम्ही इंद्रियांचे स्वामी व्हाल, इंद्रियें तुमच्यावर स्वामित्व मिरवूं शकणार नाहींत. नाहीं-तर वासनांचें दमन होणार नाहीं व पुनः विषय दृष्टिस पडला म्हणजे उपभोगेच्छा प्रबळ होऊन तुम्ही तद्वश व्हाल. चातुर्मास्यांत कित्येक लोक मीठ वर्ज करितात; परंतु त्यामुळे मिठावरील अभिरुचि कमी न होता, केव्हां चातुर्मास एकदांचा संपेल आणि केव्हां मीठ खाईन अशी एकसारखी लालसा उत्पन्न होते ! दृष्टीचा किंवा श्रवणाचा, अथवा घ्राणाचा विषय देवालयांत आणण्याचा हेतु असतो एक, आणि परिणाम होतो भलताच. मशिदींत अथवा प्रार्थनेच्या स्थळीं रंग, वाद्य वगैरे उपकरणें कांहींच असतां कामा नयेत, असा महंमदी धर्माचा यासंबंधानें कटाक्ष आहे. म्हणून मशिदीच्या भिंती, सभा-मंडप वगैरे पहावे तर सर्वत्र सफेत; रंग अथवा चित्रे दृष्टीस पडावयाचीं नाहींत. खिस्ती देवळांत तीं जितक्यास तितकीं अगदी बेताबातानें असतात. हिंदूंच्या देवळांत मात्र उपकरणांच्या संबंधानें पराकाष्ठा होऊन गेलेली असते. जितकीं असतील तितकी थोडीच; सर्व प्राधान्य त्यांसच मिळत आहे व भजन, कीर्तन यांच्याकडे दुर्लक्ष. हें पाहिलें म्हणजे, एकपरी उपकरणें अगदींच नसलेलीं पत्करलीं असें वाटतें. असो. आतां स्पर्शाचा प्रकारही असाच आहे :—

स्पर्श घेइजे निजदेहीं । तंव देहींच प्रगटे विदेही ॥
मग स्पर्शी जें जें कांहीं । तो तो भोगूं पाही ब्रह्मार्पणें उठी ॥

सुखोपभोग घ्या, परंतु तो येतो कोठून, स्पर्शसुख घ्या, पण तें येतें कोठून, त्याचा निर्माणकर्ता कोण, याचा शोध आपणांस प्रत्येक वेळीं झाला पाहिजे. अशा रीतीनें स्पर्शसुख घेतलें, तर त्यापासून अपाय न होतां प्रत्येक स्पर्शाच्या वेळीं विदेही जो परमेश्वर त्याची आपणांस आठवण होते आणि अशा रीतीनें सर्व सुख ब्रह्मार्पण होतें. आणि गतीचाही प्रकार तसाच आहे.

जेउतें जेउतें चालवी पाये। तो तों मार्गु देवोंचि होये॥

मग पाउलांपाउलीं पाहे। निजभजन होये ब्रह्मार्पणाशीं॥ १॥

चालतांना आपण परमेश्वराच्या कृपेनें चालत आहों आणि जितका मार्ग आपण क्रमण केला तो परमेश्वराच्या कृपेनें केला असें समजावें. सर्व मार्गच आपला आहे व तो सर्व स्वपराक्रमानें क्रमितों, असें मानणें मोठी चुकी होय. सर्व सुखें आपलीं आहेत असें समजूं नये, तर जें सुख आपणांस मिळालें तें परमेश्वराच्या कृपेनें आपणांस मिळालें असें मानून त्याचा सदुपयोग आपण करावा. आपण आगगाडींतून प्रवास करीत असलों, तर आपल्या तिकिटापुरता प्रवास करावा. तिकिटाबाहेर प्रवास करणें, किंवा सर्व आगगाडीच आपली आहे असें म्हणणें बरोबर होणार नाहीं; तद्वत् या सर्व विषयोपभोगांचा प्रकार आहे. दृष्टीचा काय, घ्राणाचा काय, कर्णांचा काय, जिव्हेचा काय, स्पर्शाचा काय, अगर गतीचा काय विषय पुढें आला असतां सर्वसमर्थ सृष्टिनियंत्यानें जे नियम घालून दिले आहेत त्यांप्रमाणें त्यांचा मितपणानें उपभोग घ्यावा व तो घेतांना त्यांचा उत्पन्नकर्ता व दाता याचें चिंतन करावें, हाच आपला अधिकार, हेंच आपलें कर्तव्य. सारांश, नुसते टाळ वाजविले, रंग केले आणि जर देवाची भावना होत नाहीं, तर मग तो शुष्क कोरडा कर्ममार्ग झाला. त्यांत भजनाचें व भक्तिमार्गाचें स्वारस्य मुळींच राहिलें नाहीं. योगमार्गांत योगी विषय त्यागितात, परंतु देहाला अत्यंत क्लेश व दुःख करून घेतात. इतकें करूनहि मनोवृत्तींचा धर्म झिडकारून टाकतां येत नाहीं, अगर त्यांचें उन्मूलन होत नाहीं, क्वचित् त्यांचा अंमल कमी करितां येतो. परंतु शरीरास व मनास क्लेश व दुःख न होतां तो कमी करण्याचें सामर्थ्य भक्तिमार्गाच्या अंगीं आहे, तसें दुसऱ्या तिन्ही मार्गांत नाहीं. भक्त विषयोपभोग घेतात, सर्वत्याग करून बसत नाहींत. पण विशेष हा कीं, ते देवाला सर्व अर्पण करितात. आतां, खरा भागवतधर्म आपणास साधल्याची खात्रीलायक खूण म्हटली म्हणजे, इंद्रियांचा प्रत्येक व्यापार होत असताना परमेश्वराचा आपणास बोध होतो कीं नाहीं, विषयांचें प्राधान्य—विषयांचा अंमल—नाहींसा होऊन आपल्या मनांत परमेश्वरास प्राधान्य मिळालें आहे कीं नाहीं याचा शोध बारकाईनें आपण केला, म्हणजे आपणांस मिळतो. वृत्ति दडपून सिद्धी होणार नाहीं, झालीच तर वृत्तींस चांगलें वळण लावून त्यांचा क्षोभ कमी करून होणार आहे; हाच भागवतधर्माचा विशेष, हेंच भागवतधर्माचें खरें स्वरूप होय.

# स्वामी रामतीर्थ पुण्यस्मरण

लेखक : प्रा. मधुकर काळे, एम्. ए.

Good thoughts, his only friends,
His wealtb, a well spent age,
The earth, his sober inn,
And life, a puiet piligrimage,–

66

स्वामी रामतीर्थ हे भारताचे प्रती विवेकानंद होत. विवेकानंदांनी आपल्या अद्भुत सामर्थ्याने अखिल विश्वात वेदान्ताचे भव्य मंदिर उभारले. स्वामी रामतीर्थांनी त्यावर वेदान्तविजयाचा सुंदर सुवर्णकळस चढविला. 'अत्यंत सुंदर जीवन म्हणजे अनंत जीवनातच आपले यथार्थ जीवन आहे हे ओळखून वागणे होय.' ह्या रवीन्द्रनाथांच्या उदात्त विचाराचे उत्तम उदाहरण म्हणजे स्वामी रामतीर्थांचे जीवनदर्शन होय.

कवीचे अंतःकरण, कलावंताचे मन, शास्त्रज्ञाची बुद्धी, तत्त्वज्ञाची चिंतनशक्ती आणि संताचे अद्भुत सामर्थ्य ही सर्व ज्याच्यामध्ये एकवटलेली होती अशा या महापुरुषाचा जन्म २० ऑक्टोबर इ. स. १८७३ रोजी पंजाब प्रांतांत गुजराणवाला जिल्ह्यातील मुरलीवाला नामक खेड्यांत झाला. तीर्थराम ऊर्फ रामलाल हिरानंद गोस्वामी हे त्यांचे पूर्ण नांव! आडनांव गोस्वामी असण्याचे कारण ते गोस्वामी तुलसीदासांनी जन्मून पावन केलेल्या सत्कुलात जन्मले. पुढे आपल्या लोकोत्तर विभूतिमत्वाने तीर्थरामाचे 'स्वामी रामतीर्थ' झाले.

वडील हिरानंद उपाध्येपणावर प्रपंच चालवीत असत. अठराविश्वे दारिद्रय. स्वामींना बालपणीच मातृवियोग सोसाव लागला. त्यांचे पालनपोषण त्यांच्या आतेने अत्यंत कळकळीने केले. तिच्या निर्मळ व प्रेमळ सहवासाने बालपणीच त्यांना भजनाचा व कथाश्रवणाचा नाद लागला. स्वामीजींनी स्वतःविषयी एकदा असे सांगितले होते की, "बाल्यावस्थेत शंखाचा आवाज किंवा प्रणवोच्चार यांचा रामाच्या चित्तावर इतका परिणाम होत असे की, तो ऐकल्याबरोबर रामाचे रडणे एकदम थांबे व राम एकदम चूप होऊन जाई."

दुय्यम शिक्षणाकरिता गुजराणवाला येथे असताना स्वामीजींना 'धन्ना भगत' नावाच्या सिद्धपुरुषाचा सहवास घडला. तीर्थरामाचे जीवन पावन करण्याचे काही अंशी भाग्य त्यांना लाभले. स्वामीजींच्या अंतकरणांत या सिद्धपुरुषाविषयीं आजन्म नितांत श्रद्धा होती. धन्ना भगताला पाठविलेली स्वामीजींची एकूण १३०० पत्रें उपलब्ध आहेत. ती पत्रें म्हणजे गुरुभक्तीनें ओथंबलेला स्वामीजींच्या आंतरिक विकासाचा इतिहासच होय. त्यापैकीं एका पत्रात विद्यार्थी तीर्थराम लिहितो –" हे परमात्मन्! हे श्री गुरुदेव!! एम. ए. झाल्यानंतर माझी कांहीं इच्छा असलीच

तर ती अशा प्रकारचें कार्य करण्याची आहे, की जेणेंकरून माझा प्रत्येक श्वासोच्छ्वास भगवंताच्या सेवेसाठीं मला लावता येईल."

तीर्थरामांचा मिडल स्कूल एन्ट्रन्स परीक्षेत पहिला नंबर आला. खूप शिक्षण घेण्याचा उत्साह दुणावला. पण आत्यंतिक दारिद्र्यामुळे यापुढं तीर्थरामाने शिक्षण न घेता कोठेतरी नोकरी करावी असा आग्रह त्यांचे वडील सतत करू लागले. पंधराव्या वर्षीच नोकरी पत्करून शिक्षणाला अखेरचा रामराम ठोकणे तीर्थरामाला पसंत पडले नाही. अखेर वडिलांनी त्यांना घरातून हाकलून दिले. मात्र त्यांचा दृढनिश्चय ढळला नाही.

अशा कोवळ्या वयात निराधार स्थितीत भगवंतावर भरवसा ठेवून तीर्थराम शिक्षणासाठीं लाहोरास आले. स्कॉलरशिप व खाजगी शिकवण्या ह्यांच्या बळावर तीर्थरामांनीं बी. ए. पर्यंत प्रथम श्रेणी कायम ठेवून मजल मारली. बी. ए. ला असताना स्वामीजींना एक विद्यार्थी टोचून बोलला—"तुलसीदासांच्या वंशात जन्मूनही कुलभाषा संस्कृत न यावी व फारशीसारख्या यावनी भाषेत खूप लौकिक मिळवावा..." हे ऐकून त्यांच्या मनावर खूप परिणाम झाला व त्याच दिवसापासून त्यांनी निर्धार केला—"मी बी. ए. च्या परीक्षेत फारशीऐवजी संस्कृत विषय घेऊनच बसणार!"

तीर्थरामांना बी. ए. पर्यंत संस्कृतचा गंध नसल्याने त्यांना प्राध्यापकांनी मनाई केली. तरीही खाजगीरित्या अभ्यास करून, खूप परिश्रम घेऊन त्याच वर्षी बी. ए. च्या परीक्षेत तीर्थराम संस्कृतमध्ये पहिले आले. पण इंग्रजी विषयाची विशेष तयारी न होऊ शकल्यामुळे इंग्रजीत चार मार्कांनी नापास झाले. पंजाब विश्वविद्यालयाच्या काही सभासदांनी स्वामीजींचे सर्व विषयातील मार्कस मिळवून पाहिले तर ते आश्चर्यचकित होऊन म्हणाले की, "या विद्यार्थ्याला इंग्रजीत आणखी चार मार्क्स मिळते तर तो संबंध पंजाबमध्ये पहिला आला असता!" पण प्रत्येक विषयात पास होण्याचा नियम असल्याने रामतीर्थ बी. ए. नापास झाले.

खडतर उपवास सोसून, वाटेल ते हाल भोगूनही आणखी या आपत्तीची भर! रामतीर्थ ढसढसा रडले. त्यातच त्यांच्या कठोरहृदयी बापाने स्वामीजींच्या पत्नीला त्यांचेजवळ आणून दिले. निराशेच्या गडद अंधःकारातही अश्रूंच्या जलाने व श्रद्धेच्या फुलाने भगवंताचे चिंतन सपाट्यून सुरू झाले व त्या व्याकुळतेने आर्त उद्गार निघाले—

"कुन्दनके हम डले है, जब चाहे तू गला ले।
बावर न हो तो हमको, ले आज आजमा ले॥
जैसी तेरी खुशी हो, सब नाच तूं नचा ले।
सब छान बीन कर ले, हर तौर दिल जमा ले॥
राजी है उसीमें, जिसमे तेरी रज़ा है।
याँ यूं भी वाहवा है, वाँ वूं भी वाहवा है॥

शेवटी ही दुःखद निराशा पळत्या ढगाची सावली ठरली. आशेची किरणे पसरल्याने ध्येयाची वाट स्पष्ट झाली. त्यांचे मावसे डॉक्टर रघुनाथदास यांनी दरमहा काही मदत देण्याचे कबूल केले. रामतीर्थांनी पुन्हा बी. ए. ची तयारी केली व पंजाब विश्वविद्यालयातून ते पहिले आले. नंतर काही कालपर्यंत फोरमन कॉलेज, लाहोर येथे वेतन न घेता बी. ए. च्या वर्गाला गणित शिकवू लागले. अशा रीतीने सेवा चालू असतानाच स्वामीजी एम. ए. च्या परीक्षेतसुद्धा गणित विषय घेऊन पहिले आले. या वेळीं त्यांचे वय केवळ २२ वर्षांचे होते.

आत्यंतिक दारिद्र्यांतून केलेल्या खूप परिश्रमामुळ स्वामीजींची प्रकृति अतिशय खालावली. शारीरिक सामर्थ्य वाढविण्याचा त्यांनीं कसून प्रयत्न केला. रामतीर्थ दररोज ३०–४० मैल हिमालयाच्या पहाडात सहज चालून जात असत. कधी कधी ते बर्फांत राहात असत व भयंकर अशा गुहेंत एकटेच निजत असत. पावसाळ्यांत महापुरातून कित्येक लोकांची गुरें त्यांनीं वांचविल्यामुळें पहाडी लोक त्यांना धन्यवाद देत. अमेरिकेंत असतांना एकदा ते तेथील शिपायांबरोबर ४० मैलांच्या शर्यतीत गमतीने धावू लागले आणि शर्यंत जिंकणाऱ्या गड्याच्या दोन तास आधी आले. रामतीर्थांनी आजन्म व्यायाम केला. सारांश, अशक्त, कृश अशा तीर्थरामाचे रूपांतर धाडसी, तेजःपुंज अशा तरुणात झाले.

इंग्लंडला जाऊन गणित विषय घेऊन रँगलर बनावे अशी इच्छा एम्. ए. नंतर स्वामीजींना झाली. पण असल्या लौकिक परीक्षा देऊन रँगलर होण्यापेक्षा ते एक अलौकिक सत्पुरुष व्हावे असा ईश्वरी संकेत असल्यामुळेच की काय, त्यांची पात्रता असूनही स्कॉलरशिप त्यांना न मिळता ती दुसऱ्या एका विद्यार्थ्यास मिळाली.

स्वामीजींच्या शिक्षणाची कामना येथेच पूर्ण झाली. काही काळपर्यंत ते सियाल-कोट येथे हायस्कूलचे हेडमास्तर होते आणि त्यानंतर लाहोरला फोरमन कॉलेजमध्ये प्राध्यापक झाले. स्वामीजींचा प्रपंच नीटनेटका होता. पत्नी स्वभावानुरूप होती. रामतीर्थांना मदनमोहन व ब्रह्मानंद नावाची दोन मुले व एक मुलगी होती.

प्रपंच व अध्यापन चालू असतानाच त्यांची वृत्ति आतून संन्यासाची तयारी करीत होती. ग्रंथाध्ययन, ध्यान, धारणा व क्षेत्रदर्शन चालूच होते. चित्त अधिकाधिक अंतर्मुख होऊं लागले. अश्रूंनी डबडबलेल्या हृदयांत भक्तीची कमळे फुलू लागली. अध्यापनकार्य अशक्य होऊ लागले. धर्मसभेच्या व्यासपीठावर व्याख्याने देताना नेत्रांतून अश्रुधारा सुरू होई. प्रभूविरहाने ते रात्रंदिन व्याकुळ होत. एके दिवशी द्वारका मठाचे स्वामी शंकराचार्य अचानक लाहोरास आले. त्यांच्या दिव्य ज्ञानाच्या प्रभावाने रामतीर्थांच्या अंतःकरणात वेदान्ताने कायमचीच जागा घेतली. गुरूकृपेचा परतत्त्व स्पर्श होताच रामतीर्थांची प्रभुदर्शनाची तळमळ "सर्वत्र समदर्शना"च्या प्रेमरंगांत रूपांतरित झाली आणि–

असे आत्मोद्गार आनंदसमाधीतून निघू लागले. प्रपंचात आता त्यांचे मन रमेना. प्राध्यापक असूनहि शरीरावर एक लुंगी असा त्यावेळीं त्यांचा अवतार होता.

पगार येताच दीनदुबळ्यांना वाटण्यात खर्च होई. केवळ एका वस्त्रावर त्यांनी मोठ
धर्मयात्रा केल्या. लाहोरास परत आल्यावर त्यांनी 'अलफ्' नांवाचें उर्दू व
मानपत्र सुरू केले. त्यातील स्वामीजीलिखित लेखांनी वाचकवर्ग थक्क होत होता.
त्यातल्यात्यात स्वामीजींच्याच मनावर त्याचा इतका परिणाम झाला की, तीन चार अंक
छापून निघत नाहीं तोच त्यांनी नोकरी सोडून परिवारासह जंगलची वाट धरली. ना
जोडा, ना फेटा, फक्त धोतर! अशा अलमस्त अवलियास्थितीत विद्यार्थ्यांचे आवडते
प्रोफेसर स्वामी रामतीर्थ लाहोर सोडून जातांना त्यांचेवर जनतेनें सद्‌गदित अंतः
करणाने पुष्पहारांची व जयजयकारांची वृष्टी केली. त्यावेळी त्यांनी वडिलांना पत्र लिहिले,
"...जर रामाला भगवंताचा साक्षात्कार झाला नाही तर जिवंतपणीच रामाचे
हाडे व मास भागीरथीतील माशांना अर्पण करण्यात येतील"

वयाच्या पंचविशीतच त्यांनी पूर्ण आत्मवैभव प्राप्त केले. मनाचे मौन, प्राणाचे स्तंभन व जीवाचे सांत्वन झाले रामाचे रूपांतर आत्मारामात' झाले. रूप स्वरूपी मिळाले. तीर्थराम रामतीर्थ' झाले. कमळ फुलले. भुंग्यांच्या झुंडीप्रमाणे लोकसमुदाय दर्शनार्थ लोटला. स्वामी रामतीर्थ दुनियेचे 'रामबादशाह' झाले. त्यांच्या विश्वविशाल प्रेमामुळे सर्व जातींचे, सर्व धर्मांचे लोक सारखेच आकर्षित होत असत. मुखमंडलांवर अपूर्व तेज झळकत होते. रामतीर्थांच्या रूपाने प्रेमसुखाची भरली गंगा दुथडी वाहू लागली नास्तिक, आस्तिक, ज्ञानी, अज्ञानी सर्वांचे समाधान होऊ लागले.

वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी त्यांनी संन्यास घेतला. एक वर्ष एकांतवास व खडतर तीर्थाटनात घालवून ते मथुरस आले. वाटेत गावोगावी त्यांनी आपल्या अमृतमधुर वाणीने जनताजनार्दनाला संतुष्ट केले. भारतभ्रमण पूर्ण करून हा वेदांत-केसरी टिहरी संस्थानातील घनदाट अरण्यात निघून गेला. वाघाच्या गुहेतच रामतीर्थ समाधीमग्न असत. त्यांच्या केवळ दृष्टिक्षेपाने वाघ, सिंह, रीस इ. हिंस्र पशू पळून जात. एक दिवस टिहरी संस्थानचे अधिपति तेथे अचानक आले. स्वामीजींच्या दर्शनाने आस्तिक झाले. त्यांच्या आग्रहावरूनच इ. स. १९०२ साली स्वामी विवेकानंदांच्या नंतर स्वामी रामतीर्थ विश्वधर्म परिषदेच्या निमित्ताने जपानात गेले. जपानमध्ये ठिकठिकाणी त्यांची भाषणे झाली. तेथून त्यांनी आपला एकमव पट्टशिष्य स्वामी नारायण याला देशोदेशी पाठवून ते अमेरिकेत गेले. 'महात्मा हीच खरी संस्था' अशी त्यांची धारणा होती. त्यामुळे त्यांनी संस्थांचे जाळे पसरवून शिष्यांची खोगीरभरती केली नाही.

अमेरिकेत स्वामीजी अडीच वर्षे राहिले. तेथे असतांना ते आपला बहुतेक काळ कॅलिफोर्नियाच्या जंगलात एकांतवासात घालवीत. तेथेही त्यांची राहणी इतकी साधी असे की, स्वयंपाक करण्याकरिता लागणारी लाकडे ते स्वतः मेहनत करून आणीत असत. अमेरिकेत अनेक संस्थांमध्ये त्यांची भाषणे झाली. प्रेसिडेंट रुझवेल्ट त्यांच्या दर्शनास आले होते. अमेरिकेत त्यांनी वेदांताच्या व तेथील गरीब हिंदु विद्यार्थ्यांना मदत करणाऱ्या अनेक संस्था स्थापन केल्या. पोर्टलंड, डेल्वर, शिकागो वगैरे ठिकाणी स्वामी रामतीर्थांचे स्मारक म्हणून 'रामसभा' स्थापन झाल्या. अशा रीतीने रामतीर्थ जपान,

अमेरिका, इजिप्त, आफ्रिका, इंग्लंड चीन इ. अनेक देशांत विश्वधर्मजागृतिकरिता फिरले व भूमंडळी विख्यात झाले. लाहोरला प्रोफेसर असतानाच रामतीर्थांना स्वामी विवेकानंदांनी–विश्वधर्म जागृतीचे कार्य करण्याबद्दल आदेश दिला होता. त्याप्रमाणे रामतीर्थांनी विवेकानंदांचे जीवनकार्य आमरण नेटाने पुढे चालविले. वेदांत दिग्विजय करून स्वामीजी मातृभूमीस परत आले व भारतातही नंतर त्यांनी राष्ट्रजागृतीचे कार्य सुरूच ठेवले. काही दिवसांनी पुन्हा ते हिमालयात निघून गेले. परंतु दोन वर्षांच्या त्या खडतर वनविहारात त्यांची प्रकृती खूप खालावली. त्यामुळे स्वामीजी टिहरीपासून दोन मैलांवरील गंगाकिनारी एका झोपडीत राहू लागले. १७ ऑक्टोबर १९०६ रोजी दिवाळीचे दिवशी रामतीर्थ गंगेवर स्नानास गेले असताना त्यांच्या पायाखालचा दगड निसटल्याने ते भोवऱ्यात सापडले. निघण्याचा प्रयत्न निष्फळ दिसताच ॐ्वा जयघोष करून आसनमांडी घालण्याचा त्यांनी प्रयत्न केला व ते तळाशी गेले. हेच त्यांचे महानिर्वाण ! आठ दिवसांनंतर त्याच स्थितीत स्वामीजींचा देह जसाच्या तसा वर आला. आश्चर्य हे की, जलचरांनी त्यांचा देह यत्किंचितही खराब केला नव्हता. सर्वत्र हाहाःकार झाला. अखेर स्वामीजींचा देह पेटीत बंद करण्यात येऊन लाखो लोकांच्या जयजयकारात पुन्हा गंगेच्या प्रवाहात अर्पण झाला. टिहरी संस्थानाच्या अधिपतींनी स्वामीजींच्या सन्मानार्थ तोफांच्या गडगडाटात अखेरची सलामी दिली. नंतर, मृत्यूपूर्वी काही तास अगोदर लिहिलेले स्वामीजींचे हस्तलिखित पत्र कुटीत सापडले. त्यांत मृत्युविषयी पूर्ण खुलासा होता. तेव्हा कुठे जनतेला रामतीर्थांचे...

"रामाच्या मर्जीशिवाय मृत्यूची झडप रामाच्या शरीरावर कदापिही येणे शक्य नाही." हे नेहमीचे उद्गार अक्षरशः खरे वाटले. मृत्यूसमयी रामतीर्थांचे वय अवघे ३३ वर्षांचे होते.

वेदांत हा रामतीर्थांचा आवडता विषय होता त्यांचा वेदांत सर्वव्यापी आहे. उषःकालाच्या कोमल प्रकाशात, गुलाबाच्या मुग्ध कलिकेत, दवबिंदूंच्या मौक्तिक वृष्टीत, पाखरांच्या मंजुळ आवाजात, पावसाच्या सरीत किंबहुना यच्चयावत् चराचर जीवसृष्टीत स्वामींचा वेदांत अंतर्बाह्य व्यापलेला आहे. 'वेदांत म्हणजे मूलभूत सत्य' अशी त्यांची धारणा होती. वेदांत म्हणजे बौद्धिक चर्वण नव्हे तर सर्वाभूती भगवद्भाव ! त्यांचा वेदांत पुरुषार्थसंपन्न आहे.

'वो कौनसा उकदा है जो हो नही सकता ।
हिम्मत करे इन्सान तो क्या हो नही सकता ॥"

असा त्यांचा नारा आहे. स्वामीजींचा वेदांत म्हणजे प्रपंच व परमार्थ यांचा सुंदर मेळ आहे. स्वामी रामतीर्थ वेदांत–तत्त्वज्ञानाचे स्वरूप स्पष्ट करताना म्हणतातः–

"साहसपूर्ण आगे बढनेवाला परिश्रम ! न कि जकड देनेवाला आलस्य !"
काममें आराम ! न कि थकानेवाली बेकार वृत्ति !
चित्तकी शान्ति ! न कि संशयरूपी धुन !

संघटन ! न कि विघटन !
समुचित सुधार ! न कि लकीरके फकीर !
गम्भीर और सत्यभावना ! न कि लच्छेदार बातें !
तथ्य और सत्यभरी कविता ! न कि कपोलकल्पित कहानियाँ !
घटनाओंके आधारपर तर्क ! न कि केवल प्राचीन लेखकोंके प्रमाण !
जीता जागता अनुभव ! न कि जीवनशून्य वचन !
यही सब मिलकर व्यवहारिक वेदान्त बनता है ! !

स्वामी रामतीर्थांची अमर वाणी, त्यांचा दिव्य संदेश आज जगातील ग्रंथालयात ग्रंथरूपाने विराजमान आहे.

"अखिल विश्वात स्त्री आणि पुरुषाच्या रूपात वावरणाऱ्या माझ्या अमर आत्म्यांनो..." अशी आकर्षक सुरुवात ते प्रत्येक भाषणात करीत असत. रामतीर्थांचे दिव्य जीवन ज्ञान-भक्ति-वैराग्याचा त्रिवेणी संगम होता. ऐश्वर्य—विलासाच्या सावलीत रामतीर्थ कधीच उभे राहिले नाहीत. ते अभिजात कवी होते. त्यांचे फारशी व उर्दू भाषेतील काव्यसंग्रह उपलब्ध आहेत. इंग्रजी, संस्कृत, फारशी, उर्दू, हिंदी, पाली, जर्मनी इ. अनेक भाषांवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. त्यांचे वाचन, चिंतन, मनन व लेखन म्हणजे जगदंबा कुंडलिनीचा अपूर्व चमत्कारच होता. 'दक्षता आणि चातुर्यता । व्युत्पन्नता आणि लीनता । उत्तम गुणसर्वज्ञता । तुमचे ठायी ॥" असे समर्थांच्या शब्दात त्यांचे वर्णन करता येईल. पाश्चिमात्य व पौर्वात्य तत्त्वज्ञान, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थ-विज्ञानशास्त्र, गणित, भूगोल, इतिहास, वेदवेदांगे, उपनिषदे इ. विविध विषयांवर त्यांचा पूर्ण अधिकार होता.

"तिये सिद्ध प्रज्ञेनेनि लाभे । मनाचि सारस्वते दुभे । मग सकळ शास्त्रे स्वयंभे । निघती मुखे ॥"

(ज्ञानेश्वरी अ. ६)

असे रामतीर्थांचे जीवनदर्शन आहे. रामतीर्थांचे जीवन अनंताच्या वाटेवरील थोर तीर्थस्थान बनले. स्वामी रामतीर्थांत मीराबाई तुलसीदासांची भगवत्‌भक्ती, चैतन्य महाप्रभु, रामकृष्ण परमहंसादिकांचे मधुर प्रेम, ज्ञानेश्वर, विवेकानंद, महर्षी रमण, अरविंदादिकांचे अपूर्व योगसामर्थ्य, रवींद्रांची काव्यमाधुरी व महात्मा बुद्ध, येशू, गांधीजी इत्यादिकांची शांती, अहिंसा असूनही ह्या सर्वांच्या ठायी निहित असलेले विश्वविशाल विभूतिमत्व होते. स्वानंदसाम्राज्याचे चक्रवर्ती स्वामी रामतीर्थ स्वतः सांगून गेले—

"खिदमते मुल्कमें गर्चे मर जाएंगे ।
नाम दुनियामें रोशन कर जाएँगे ॥"

—'श्री गुरुदेव'वरून साभार.

# संतश्रेष्ठाचे हिंदी अभंग

द. मो. चित्रे

संतश्रेष्ठ श्री तुकाराम महाराज यांनीं मराठी वाङ्मयांत अतिशय मोलाची भर घातली आहे. प्रसादयुक्त रचना, थोड्या शब्दांत मोठा आशय, नादमधुर शब्द, विचारांची संतत धार, साक्षात्कारी प्रत्यय यांनीं त्यांची गाथा ओतप्रोत भरली आहे. मराठी भाषेबरोबर हिंदी भाषेंतही आपले विचार उत्तम रितीनें व्यक्त करण्याचें सामर्थ्य त्यांच्या वाणींत होतें. अभंगच पहा:

" कब मरूं पाऊं चरन तुम्हारे । ठाकुर मेरे जीवन प्यारे ॥ १ ॥ ॥ धृ ॥ जग रडे ज्याकुं सो मोहि मीठा । मीठा दर आनंद माहि पैठा ॥ X ॥ मला पाऊं जनम इन्हे बेर । बस मायाके असंग फेर ॥ २ ॥ कहे तुका धन मानहि दारा । बोहि लिये गुंडलिया पसारा ॥ ३ ॥ " माझ्या जीवन कलिजा पांडुरंगा, तुझे पवित्र पाय मला कधी दिसतील? जग ज्याच्याकरतां अश्रू ढाळते तो चांगला असलाच पाहिजे. हा मायेचा पसारा मला नको. मी जन्म तुला प्राप्त करून घेण्यासाठी घेतला आहे. धन, मानमरातब, पत्नी यांचा पसारा मी तुझ्यासाठी गुंडाळून ठेवला आहे.

हे ' सांई ' तूंच माझा एकमेव आसरा आहेस ! श्री तुकाराममहाराजांनीं सांईचा धांवा ह्या अभंगांत केला आहे. " छोडे धन मंदिरबन बसाया । मांगत टुका घरघर खाया ॥ १ ॥ ॥ धृ ॥ तीनसो हम करवों सलाम । ज्यामुख बैठा राजाराम ॥ X ॥ तुलसी माला बभूत चन्हावे । हरजीके गुण निर्मल गावे ॥ २ ॥ कहे तुका जो सांई हमारा । हिरन कश्यप उन्हें मारहिं डारा ॥ ३ ॥ हे दयाघन परमेश्वरा, मी तुझ्यासाठी संपत्तीचा मोह बाजूला सारून अरण्यांत तुझे मंदिर वसविले आहे. उदरभरणासाठी मधुकरीचा अवलंब केला आहे. जो मनुष्य हरिनामाचा जप करतो त्याला माझे सहस्र दंडवंत. अंग भस्माने विभूषित करावें आणि गळ्यात तुळशीमाळ धारण करून हे दयाघि देवा, तुझेच अखंड गुणगान करावे असे वाटते. श्री तुकाराममहाराज म्हणतात, " परम बाल भक्त प्रल्हाद याच्या हांकेनुसार खांबांतून प्रगट होऊन ज्या नरसिंहानें हिरण्यकश्यपूला शासन केलें तो सर्व विश्व व्यापून दशांगुळे उरणारा परमात्मा माझा एकमेव आसरा आहे. हे मानवा, त्यालाच तूं शरण जा. "

" मंत्रयंत्र नहिं मानत साखी । प्रेमभाव नहिं अंतर राखी ॥ १ ॥ ॥ धृ ॥ राम कहे त्याके पगहूं लागूं । देखत कपट अभिमान दुर भागू ॥ ÷ ॥ अधिक याती कुलहीन नहिं जानूं । जाने नारायन सो प्रानी मानूं ॥ २ ॥ कहे तुका जीव तन डारु वारी । राम उपासींहु बलि यारी ॥ ३ ॥" देवाला वश करून घेण्यासाठीं मंत्रतंत्राची आवश्यकता नसते, फक्त अंतःकरणांत शुद्ध भाव पाहिजे. ज्याच्या अंतःकरणांत अभिमान आहे, कपट आहे त्या माणसापासून मी दूर दूर रहातो, असे प्रभूराम म्हणतो. श्री तुकाराम महाराज म्हणतात, " जात पात, कूल यांना महत्त्व नसतें. जो पांडुरंगाचा धांवा करतो त्यालाच मी मानतो. माझा कोदंडधारी प्रभुराम हा सिंहासारखा शूर आहे."

"चुराचुराकर माखन खाया । गौलनीका नंदकुमार कन्हया ॥ १ ॥ ॥ धृ ॥ काहे बराई दिखावत मोहि । जानतहुं प्रभुपना तेरा खबहि ॥ ÷ ॥ और बात सुन उखलसुं गला । बांध लिया आपना तूं गोपाला ॥ २ ॥ फेरत बनबन गाऊ धरावत । कहे तुकया बंधु लकरी लेले हात ॥ ३ ॥

संतश्रेष्ठ श्री तुकाराममहाराज यांच एक बंधु अभंग रचना करीत. श्री तुकाराम महाराजांच्याप्रमाणें त्यांच्या बंधूंनाहि हिंदीमध्यें रचना करतां येत असे. त्यांचा हा हिंदी अभंग आहे. नंदकुमार गोपालकृष्णानें लोणी मिळविलें आणि खायाला सुरुवात केली. हे गोपालकृष्णा, तुझी बढाई मला कशासाठी दाखवितोस ? तुझें मोठेपण मला पूर्ण माहीत आहे. कृष्णा, तूं आपला गळा उखळीला बांधून घेतलास ! हातामध्यें काठी घेऊन तुकया बंधु म्हणतात, "चला, चल, गोपाला, आपण सर्व अरण्यभर गात गात फिरत राहू." भगवान् श्रीकृष्ण जनमानसांत केवढें आसनस्थ झाले होते ! देव आणि भक्त, नेता आणि जनता एकमेकांत तद्रूप झाले होते !

"दासों पाछें दौरे राम । सोवे खडा आपें मुकाम ॥ १ ॥ ॥ धृ ॥ प्रेमकरडी बांधी गले । खैंच चले उधर ॥ ÷ ॥ आपने जनसुं भुल न देवे । कर हि धर आर्धे बाट बतावे ॥ २ ॥ तुका प्रभु दीनदयाला । वारि रे तुजपर हुं गोपाला ॥ ३ ॥" प्रभुराम आपल्या स्थानावर उभा आहे. धांवा केलात कीं भक्तांच्या मागे धावलाच. गळ्यांतील प्रेमरज्जूंनी तो भक्तांशी बांधला आहे. जिकडे खेचाल तिकडे तो ओढला जाईल. तो आपल्या भक्तांना कधींहि विसरत नाहीं. हातानें बोट धरून वाट दाखविण्यास नेहमी सिद्ध आहे. श्री. तुकाराम महाराजांचा प्रभु दयेचा सागर आहे. हे गोपाळकृष्णा, तुझ्याकडे मी आकृष्ट झालो आहे. मला तुझ्या पायीं आसरा दे.

"क्या गाऊं कोई सुननवाला । देखें तों सब जगही भुला ॥ १ ॥ धृ ॥ खेलों अपने रामहिसात । जैसी वैसी करहों मात ॥ ÷ ॥ कहांसे लाऊं मधुरा वानी । रीझे ऐसी लोक त्रिरानी ॥ २ ॥" गिरिधर लाल तो भाव का भुका । राग कला नहिं जानत तुका ॥ ३ ॥" मुरलीधराच्या मधुर बांसरीच्या स्वरानें मी इतका मोहून गेलो कीं सर्व जग विसरलो. प्रभु रामचंद्राच्या बरोबर खेळ खेळा. त्याच्यावर मात करण्याची शिकस्त करा. "हे देवाधिदेवा, लोकांचें मन रिझविल असा गोड आवाज माझ्याजवळ नाहीं. पण मला माहीत आहे कीं देव भावाचा भुकेला असतो." असे श्री तुकाराम महाराज म्हणतात.

"मेरे राम को नाम जो लेवे बारोंबार । त्याके पाऊं मेरे तन की पैजार ॥ × ॥ हांसत खेलत चालत वाट । खाना खाते सोते खाट ॥ १ ॥ जातनसुं मुजे कछु नहि प्यार । असते के नहिं हिंदु धेड चंभार ॥ २ ॥ ज्याका चित लगे मेरे रामको नाम । कहे तुका मेरा चित लगा त्याके पावं ॥ ३ ॥ प्रभूच्या दरबारांत जातीभेद, धर्मभेद नसतो. कबीर, बंका हे थोर रामभक्त होत. खतांना, पितांना, झोपतांना, चालतांना,

कामधंदा करतांना ज्यो रामाचें नांव घेतो तो मला फार प्रिय आहे. श्री तुकाराम महाराज म्हणतात, " माझे सर्व चित्त अशा भक्ताच्या पायाकडे असते. "

श्री. तुकाराम महाराज प्रभु रामचंद्रांशीं किती एकरूप झाले होते हे पुढील अभंगावरून व्यक्त होईल. " राम कहो जीवना फल सो ही। हरिभजन विलंब न पाई ॥ X ॥ कवनका का मंदर कवनकी झोपरी। एक रामबिन हि फुकरी ॥ १ ॥ कवनकी काया कवन माया। एक रामबिन सबहि जाया ॥ २ ॥ कहे तुका सबहि चलनार। एक रामबिन नहिं बासारा ॥ ३ ॥ रामनामाचा जप करणें हेंच जीवनाचें सार्थक होय; तरी हे भक्ता, रामनाम घ्यावयाला विलंब लावू नकोस. रामनाम हेंच मंदिर, रामनाम हीच झोपडी. रामनामाशिवाय सर्व फुकट आहे. श्री तुकाराम महाराज म्हणतात, " रामनाम हेंच चिरंतन आहे; बाकी सर्व नाशिवंत आहे "

श्री. तुकाराम महाराजांनीं हिंदीत अभंग तर लिहिले आहेत, शिवाय साक्याहि लिहिल्या आहेत. मराठींत जसे ते आपल्या आशय मोजक्या शब्दांत व्यक्त करूं शकतात तसे ते हिंदीतहि करूं शकतात. वानगीदाखल ह्या दोन साक्या पहा :

"लोमीके चित धन बैठे। कामित चित काम। माता के चित्त पुत बैठे। तुका के मन राम ॥१॥ " लोमी माणसाची नजर पैशावर, फलाशेनें काम करणाराचें मन फलावर, आईचें लक्ष सदैव असते आपल्या मुलाकडे, तसेंच श्री तुकाराममहाराजांचें मन पांडुरंगावर खिळलेलें आहे. " चितसुं चित जब मिले। तब तनु थंडा होये। तुका मिलना जिन्होसुं। ऐसा बिरला कोये ॥१॥ " एक चित्त जेव्हां दुसऱ्या चित्तावर स्थिर होते, तेव्हां मन अगदीं शांत होते; तुका जेव्हां पांडुरंगाला भेटतो, तेव्हां त्याच्याशीं एकरूप होतो.

आज भाषिकवादानें देशांत थैमान माजविलें आहे. मन अस्वस्थ करणाऱ्या घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर श्रीसंत श्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या गाथेकडे वळलें तर मनाला केवढा दिलासा मिळतो! माणसा माणसाला एकत्र आणण्याचें अत्यंत प्रभावी साधन म्हणजे भाषा. दुसऱ्याच्या मनांतील इच्छा, त्याच्या भावना, त्याचे विचार भाषेच्या माध्यमाशिवाय कसे कळणार ? पण ह्या ठिकाणीं एक गोष्ट ध्यानांत घ्यावयास पाहिजे. भाषा हें एक माध्यम आहे. वाणीचा उच्चार करणारा माणूस हा महत्त्वाचा घटक आहे. आणि त्याचाच विसर पडतो.

श्री तुकाराज महाराजांनीं मराठींत अभंग रचले, हिंदींतहिं रचले. " जें का रंजलें गांजलें। त्यासि म्हणे जो आपुलें॥ तोचि साधु ओळखावा। देव तेथेंचि जाणावा॥" ही तुकाराम महाराजांची शिकवण आहे. समाजसेवा म्हणजे ईश्वरसेवा. रंजल्या, गांजलेल्यांची सेवा करण्यांतच भाषेची सार्थकता आहे. सेवाद्वारें भारताचें ऐक्य घडो !

Let Tougue Be a Binding Force Between Man And Man ! Let India Be One Through Tongue ! Out Prayer To Thee, My Lord, My Father

---

# तुकोबांचे दोन अभंग

## संत विनोबाकृत निरूपण

आम्ही सदैव सडके । जवळी येतां चोर धाके ।
जाऊं पुढें भिके । कुतरीं घर राखिती ॥ १ ॥
नांदणूक ऐसी सांगा । नाहीं तरी वायां भागा ।
थोरपण अंगा । तरी ऐसें आणावें ॥ २ ॥
अक्षय साचार । केलें सायासांनीं घर ।
एरंड सिहार । दुजा भार न साहती ॥ ३ ॥
धन कण घरोघरीं । पोट भरे भिकेवरी ।
जतन तीं करी । कोण गुरें वासरें ॥ ४ ॥
झाली सकळ निश्चिंती । भांडवल शेण–माती ।
झळझळीत भिंती । वृंदावनें तुळशीचीं ॥ ५ ॥
तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा ।
कुटुंबाची सेवा । तोचि करी आमुच्या ॥ ६ ॥

आम्ही नेहमीचेच नंगे. त्यामुळें चोरसुद्धां जवळ यावयाला भितो. बाहेर भीक मागावयाला गेलों म्हणजे इकडे कुतरीं आमचें घर सांभाळतात. अशी कोणाची वागणूक असेल तर सांगा. बाकीच्या क्षुद्र वैभवाच्या गोष्टी म्हणजे फुकट शीण आहे. तो नका मला सांगूं. महत्त्वाकांक्षाच राखावयाची तर आमच्यासारखे होण्याची राखा. आम्हीं मेहनत करून खरोखरच अक्षय घर संपादन केलें आहे. वरून वरूनच पहाल तर एरंडाच्या आणि शेराच्या लांकडांचें बनलेलें. दुसऱ्या कशाचाच भार म्हणून सहन व्हावयाचा नाहीं. आमची संपत्ति घरोघर सांठवून ठेवली आहे. त्यांतून भूक लागेल तेव्हां मागून घेतों. गुरें-ढोरें कोण राखत बसतो ? आम्हांला सर्व प्रकारची निश्चिती आहे. शेण-माती हें आमचें भांडवल. त्याच्या योगानें तुळशी-वृंदावन आणि कुडाच्या भिंती झळझळीत सारवून ठेवनों. तुकाराम महाराज म्हणतात, आम्हीं आमच्या सर्व वासना देवावर सोंपविल्या आहेत. तोच आमच्या कुटुंबाची काळजी करीत असतो.

ह्या अभंगांत अपरिग्रह–वृत्तीची मौज वर्णिली आहे.

पहिल्या पांच चरणांत स्थूल अपरिग्रह वर्णिला आहे, पण त्याचा अक्षरशः अर्थ

घ्यावयाचा नाहीं. त्यांतून सूक्ष्म भाव ग्रहण करावयाचा आहे. तो शेवटच्या चरणांत आहे.

जनक राजा सर्व परिग्रहांनीं गुंडाळलेला दिसत असूनहि संपूर्ण अपरिग्रही होता. उलटपक्षीं निःसंग म्हणविणारा यतिहि लंगोटीच्या परिग्रहांत पुरता गुरफटलेला असणें शक्य आहे. परिग्रह मनांतून सुटला पाहिजे. केवळ बाहेरून सोडण्यानें तो सुटत नाहीं.

> घरीं कुटुंबपणें सरे । तरी वनीं वन्य होऊनि अवतरे ।
> जो नागवीयाहि शरीरें । लागला आहे ॥ —ज्ञानदेव

म्हणून सर्व वर्णनाचा भावार्थ अभंगाच्या शेवटच्या चरणांत आहे.

(१) तुका म्हणे देवा । अवघा निरविला हेवा—

> ‘ काम क्रोध आम्हीं वाहिले विठ्ठलीं ।
> आवडी धरिली पायांसवें ॥ १ ॥
> आतां कोण पाहे मागें परतोनि ।
> गेले हारपोनि देह-भाव ॥ २ ॥ ’

अपरिग्रहाचा खरा अर्थ देह-भाव नाहींसा होणें हा आहे. कारण शरीर हाच मुख्य परिग्रह आहे.

(२) ज्याचा देह-भाव नाहींसा झाला आणि ज्यानें सर्व वासना देवावर सोंपविल्या त्याच्या घरची सेवा भगवान् स्वतः करतात. त्याला लक्ष्मीची काय गरज आहे ?

> अनन्याश्चिन्तयन्तो मां ये जनाः पर्युपासते ।
> तेषां नित्याभियुक्तानां योग-क्षेमं वहाम्यहम् ॥

ह्याच गीतावचनाचा स्पष्ट आधार दुसरीकडे दिला आहे.

> गीतेमाजीं शब्द दुंदुभीचा गाजे ।
> योग-क्षेम काज करणें त्यांचें ॥

(३) देवावर हवाला सोंपविणें हाच ‘ भिक्षेचा ’ खरा अर्थ आहे. स्थूल भिक्षेचें ह्या अभंगांत मौजेनें वर्णन केलें असलें तरी महाराजांना स्थूल भिक्षा कधीच पसंत पडली नाहीं. किंबहुना लोकांपाशीं भिक्षा मागणें म्हणजे ईश्वरावर विश्वास नसल्याची एक खूण आहे, असें त्यांनीं म्हटलें आहे. लोकांवर भार टाकणें हा भक्तीचा व्यभिचार.

> भिक्षापात्र अवलंबणें । जळो जिणें लाजिरवाणें ।
> ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ॥ १ ॥
> देवापायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव ।
> समर्पिला जीव । नाहीं, तों हा व्यभिचार ॥ २ ॥
> जना घालावें सांकडें । दीन होऊनि बापुडें ।
> हेंचि अभाग्य रोकडें । मूळ हा अविश्वास ॥ ३ ॥ -

काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार ।
तुका म्हणे सार । दृढ पाय धरावे ॥ ४ ॥

आम्हा-घरीं एक गाय दुभताहे ।
पान्हा ग सामाये त्रि-भुवनीं ॥ १ ॥
वान तें सांवळें नांव तें श्री-धरा ।
चरे वसुंधरा चौदा भुवनें ॥ २ ॥
वत्स नाहीं माय भलत्यासवें जाय ।
कुरवाळी तो लाहे भाव-भरणा ॥ ३ ॥
चहूं धारीं क्षीर वोळली अमूप ।
धाले सनकादिक सिद्ध मुनि ॥ ४ ॥
तुका म्हणे माझी भूक तेथें काय ।
जोगाविते माय तिन्ही लोक ॥ ५ ॥

आमच्या घरी एक दुभती गाय आहे. तिचें दूध तिन्हीं लोकात मावत नाहीं. रंगाची सांवळी आहे. आणि नांव 'श्री-धरा.' पृथिव्यादि चौदा भुवनें हें तिचें चरण्याचें कुरण आहे. तिचें अमुक एक म्हणून वासरू नाहीं. सर्वांचीच ती माय आहे. आणि वाटेल त्याच्याबरोबर जाते. जो तिला कुरवाळील त्याला त्याच्या इच्छे-प्रमाणें भरून काढते. तिच्या चारी स्तनांतून अमूप दूध निघतें. तें पिऊन सनकादिक मुनि सिद्ध झाले. तुकाराम महाराज म्हणतात, ही माय तिन्ही लोकांना पोसायला बसली आहे, तिथें माझी ती भूक कितीशी आहे ?

तुकाराम महाराजांचा फाटका संसार पाहून कोणीं कींव प्रगट केली असेल त्याला उद्देशून ह्या अभंगांत आपल्या वैभवाचा एक मासला महाराजांनीं दाखविला आहे.

मोक्ष-श्रिया अलंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्री असंख्यात । नृपति केले ॥—समर्थ

( १ ) आमच्या गाईचा पान्हा तिन्ही भुवनांत मावत नाहीं—

विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् । —गीता

हे सर्व जग मीं माझ्या एका च अंशानें भरून काढलेलें आहे.

पादोऽस्य विश्वा भूतानि । —ऋग्वेद

हे सर्व भौतिक विश्व म्हणजे त्याचा एक अंश आहे.

( २ ) चरे वसुंधरा चौदा भुवनें । —

'अत्ता चराचर-ग्रहणात्' ह्या सूत्रांत ईश्वराचें सर्व-भोक्तृत्व वर्णिलें आहे. श्रुति गमतीनें म्हणते—

यस्य ब्रह्म च क्षत्रं च उभे भवत ओदनः ।
मृत्युर्यस्योपसेचनं क इत्था वेद यत्र सः ॥ —कठ

( ४ ) चहू धारी क्षीर—

चारी पुरुषार्थ ईश्वराच्या आश्रयाला राहतात.

तैसें सकळ पुरुषार्थ । जेणें स्वामी का सनाथ ।
तो श्रीकृष्ण रावो जेथ । तेथ लक्ष्मी ॥
आपुलेनि कांतसीं । ते जगदंबा जयापासीं ।
आणिमादिकी काय दासी । नव्हती तयाते ॥
म्हणोनि जिया बाहीं उभा । तो लक्ष्मियेचा वल्लभा ।
तेथ सर्व सिद्ध स्वयंभा । येर मी नेणे ॥ —ज्ञानदेव

( ५ ) तो तिन्ही लोकांपुरते द्यायला बसला तिथें मी घेऊन घेऊन किती घेणार ?

अनंत हस्ते कमलावराने ।
देतां किती घेशिल दो कराने ॥ —वामन

जो परमात्मा ब्राह्मण आणि क्षत्रिय दोघांनाहि मऊ मऊ भाताप्रमाणें मटकावून टाकतो आणि प्रत्यक्ष मृत्यु हें ज्याचें तोंडी लावणें त्याला कोण ओळखूं शकतो ?

( ३ ) ह्या गाईचें अमुक म्हणून खास वासरूं नाहीं. जो कुरवाळील त्याची ही गाय आहे—

समोऽहं सर्व-भूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ।
ये भजन्ति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ —गीता

मी सर्वां भुतांचे ठायीं सारखा आहें. मला कोणी दोस्त नाहीं आणि कोणी दुश्मन नाहीं. पण जे प्रेमपूर्वक मला भजतात ते माझ्यांत राहतात आणि मी त्यांच्यांत राहतों.



# श्री साई फौंडेशन

## जनतेस विनंति

श्री साईबाबांच्या ५० व्या पुण्यतिथीनिमित्त जो सुवर्ण महोत्सवी कार्यक्रम आंखण्यांत येत आहे त्यापैकी एक महत्त्वाचा व सर्वव्यापी कार्यक्रम म्हणजे "श्री साई फौंडेशन"ची स्थापना खंबीर पायावर करणें हा होय.

समाजांत सदाचाराची वाढ होणें अत्यंत जरूर आहे. जनतेचें आरोग्यमान सुधारलें पाहिजे. सर्वत्र शिक्षणाचा प्रसार झपाटेबंद स्वरुपांत झाला पाहिजे.

खेड्यांतील लोकांचे रहाणीमान सुधारलें पाहिजे. त्यासाठीं शेतीचें उत्पादन वाढलें पाहिजे. व तें वाढवावें यासाठीं शेतकरीवर्गास जरूर तो सहकार देण्यांत आला पाहिजे. खेड्यांतील लोकांचे रहाणीमान त्यांचें उत्पादन वाढवून त्याद्वारें त्यांची आर्थिक अडचण दूर केल्याशिवाय कसें वाढेल ?

अशारीतीनें जनतेची विविध प्रकारें सेवा करण्याच्या हेतूनें व जनतेंत सुख समाधान नि आनंद नांदावा या हेतूनें 'श्री साई फौंडेशन' स्थापन करण्यांत येत आहे.

श्री साईबाबांच्या अवतारकार्याचें रहस्य तरी दुसरें काय आहे ? लोकांनीं सुखी व समाधानी व्हावें, त्यांना जीं जीं दुःखें सतावीत असतील त्यापासून त्यांची मुक्तता व्हावी, यासाठीं बाबा सदैव झटले व आजही कोणत्या ना कोणत्या रूपानें झटत आहेत.

जें बाबांचें जीवनकार्य होतें तें पार पाडण्यासाठीं त्यांच्या नांवें स्थापन होणारें श्री साई फौंडेशन मनोभावें झटणार आहे. असें हें फौंडेशन कार्य नांवारुपास यावें यासाठीं त्याला शक्य त्या परीनें व शक्य त्या प्रमाणांत आर्थिक हातभार लावणें हें प्रत्येकाचें पवित्र कर्तव्य आहे. तें पार पाडण्यासाठीं श्री साईबाबांनीं सर्वांना प्रेरणा द्यावी व हें महत्तम कार्य चालकांकडून पार पाडवून घ्यावें ही आमची प्रार्थना आहे.

# एकनाथस्वामींची शिकवण

एकनाथाच्या पदांत व अभंगांत औत्सुक्य, प्रेम आणि शांतिरस किती भरलेला आहे, ह्याची खात्री तीं पदें आणि ते अभंगच करीत आहेत. एकनाथाच्या कवनांत वैराग्य उत्पन्न करण्याची करामत किती अजब आहे. आणि तीं कवनें ऐकणाराच्या चित्तवृत्तींत कसा त्वरित फेरबदल करितात, ह्याविषयींच निराळी मीमांसा करण्याचें मुदलींच कारण नाहीं. ज्या लोकांनीं उत्तम भजनकारांच्या व कथेकऱ्यांच्या तोंडून एकनाथाचीं कवनें ऐकिलीं असतील; त्या लोकांच्या प्रचितीस त्या कवनांचा अद्भुत प्रभाव आल्याशिवाय कधींच रहावयाचा नाहीं.

मूर्तिपूजेविषयीं एकनाथाचे विचार शुद्ध आणि नीतीला अनुसरून आहेत. कोंबड्या किंवा बकरीं मारून त्यांचा नैवेद्य देवास अर्पण करण्याची जी घातुक आणि घाणेरी चाल कित्येक जातींत आहे ती अत्यंत निंद्य आहे असें एकनाथाचें मत आहे.

**म्हणती देव मोठे मोठे । पूजिताती दगड गोटे ॥ १ ॥**
**कष्ट नेणती भोगिती । वहा, वहा, दगडासी म्हणती ॥ २ ॥**
**जीत जिवा करुनि वध । दगडा दाविती नैवेद्य ॥ ३ ॥**
**रांडा पोरें मेळ झाला । एक म्हणती देव आला ॥ ४ ॥**
**नाक घांसुनी गव्हार । देवा म्हणती गुन्हेगार ॥ ५ ॥**
**एका जनार्दन म्हणे । जन भुलले मूर्खपणें ॥ ६ ॥**

यावरून पशुघात करून ईश्वरास प्रसन्न करणें अति निंद्यकर्म होय असें त्याचें मत होतें; आणि 'जीत जिवा करुनि वध' यावरून शाक्तमत एकनाथास पसंत नव्हतें असें सिद्ध होतें, कारण शाक्तमतानुयायी असणाऱ्या लोकांना पशुहिंसा करणें अवश्य पडतें. साधुवर्य तुकारामही शाक्तमताला शिव्या देत असे. 'अहिंसा परमो धर्मः' हाच त्याचा सिद्धांत आहे.

कित्येक जातींत अमवास्येला किंवा मंगळवारीं 'खंडोबा अंगांत येतो' असें म्हणून जें मोठेंच बंड माजत असतें व त्यावेळीं भोळ्याभाबड्या लोकांची जी गर्दी जमते, तो सर्व प्रकार केवळ मूर्खपणाचा आहे असें 'रांडा पोरें मेळा झाला। एक म्हणती देव आला' या वाक्यावरून एकनाथाचें मत स्पष्ट दिसतें. आणि हें उघड आहे कीं 'ज्यांची आचरणें अत्यंत निंद्य, ज्यांची कृति सर्वदा स्वहिताची; व ज्यांच्या

मनांत निरंतर द्वैतभाव, अशा प्राण्याच्या ठिकाणीं आत्मस्वरूपाचा प्रकार कधींच घडणें नाहीं.

त्याप्रमाणेंच, आम्हीं कितीही दुराचरण केलें, शेंकडों लोकांच्या जरी माना कापिल्या, आणि आमरणांत विषयोपभोग भोगिले, तथापि देवापुढें नाकदुऱ्या काढिल्या म्हणजे, आमचें पाप नाहींसें होईल,' असें मानणारे जे लोक असतील व वैदिकधर्मांत पापविमोचनाचा मार्ग हाच सांगितला आहे, अशी ज्यांची भ्रामक समजूत झाली असेल. त्यांनीं ' नाक घांसुनी गल्हार। देवा, म्हणती गुन्हेगार ॥ एका जनार्दन म्हणे। जन भुलले मूर्खपणें ॥ ह्या नीतिपर अभंगद्वयाकडे लक्ष द्यावें. सदाचरण ठेवण्याकडे निरंतर प्रवृत्ति, आणि प्रसंगवशात् पाप घडलेंच तर त्याविषयीं अंतःकरणपूर्वक चिरकालिक पश्चात्ताप, हीं जर असतील, तर पापविमोचनाचा संभव, नाहींतर प्रसूतिवैराग्य किंवा स्मशानवैराग्य प्राप्त होणाऱ्या कोडग्या पाप्यास, केवळ एकदां वरवर नामस्मरण केल्यानें, किंवा देवापुढें नाक घांसल्यानें. जर पवित्रपणाचा पुतळा बनतां येतें, तर या जगतांत कोट्यवधि एकनाथ निपजले असते. परंतु देवाचा असा हेतु दिसत नाहीं. बाह्य पवित्रता कांहींएक कामाची नाहीं. अंतःकरण शुद्ध पाहिजे हेंच खरें प्रमेय होय.

ईश्वराचें नांव कसें घ्यावें, आणि तें कोणत्या उद्देशानें घ्यावें, ह्याविषयीं एकनाथानें जागोजाग उपदेश केला आहे. बाह्यांतकारी नामस्मरणाचा आव घालून आंत जर शुचिर्भूतता नसेल, तर तो नामस्मरणाचा प्रयत्न व्यर्थ होय.

नाम स्मरतों ह्मणुनी आचराल दोष।
तरी श्रवण, मनन, भक्ति पडियली वोस ॥ १ ॥
रामनामाचेनि बळें नका करूं अधर्म।
देवाविषयीं तुमचें शुद्ध नोहे कर्म ॥ २ ॥
दुर्वासाचें पाप अंबऋषी दिल्हा शाप।
देवाचेनि चक्रें तया दीधला संताप ॥ ३ ॥
निःशाप मांडव्य शूळावरी वाहिला।
इतक्यासाठीं यम दासपुत्र झाला ॥ ४ ॥
सत्यवचनी धर्म सदा असे एकनिष्ठ।
असत्यमात्रें तयाचा झडला अंगुष्ठ ॥ ५ ॥
एका जनार्दनी संत सोईनें चाले।
सद्गुरूचेनि कृपें सबाह्य शुद्ध झाले ॥ ६ ॥

तोंडानें मात्र रामनाम घेतलें आणि कृति करितांना खुशाल ' मनःपूतं समाच-

रेतू ' असें आचरण ठेविलें, तर त्या नामाचें कांहींच महत्त्व आम्ही मानीत नाहीं असें होतें. एकनाथाची नामस्मरणाची व्याख्या ही आहे कीं, ' ज्या नामस्मरणांत श्रवण, मनन आणि भक्ति ह्यांचें ऐक्य होत नाहीं. तें नामस्मरणच नव्हे. '

**नाम वदतां हे वैखरी । चित्त धांवे विषयावरी ॥ १ ॥**
**कैसें होताहे स्मरण । स्मरणामाजी विस्मरण ॥ २ ॥**
**नामरूपा नाहीं मेळ । नुस्ता वाचेचा गोंधळ ॥ ३ ॥**
**एका जनार्दनीं नाम । नामीं प्रगटे आत्माराम ॥ ४ ॥**

हरिनाम उच्चारणाऱ्या सर्व स्त्रीपुरुषांनीं एकनाथाचा हा अभंग आपल्या हत्पट्टिकेवर लिहून त्याप्रमाणें जर त्यांनीं नामघोष चालविला, तर किती फायदे होतील ! हल्लींचा नामघोष पाहिला तर ' नुस्ता वाचेचा गोंधळ ' असाच प्रकार पुष्कळ ठिकाणीं दृष्टीस पडतो. एकनाथाचा उपदेश नेहमीं असा असे कीं, प्रत्येक मनुष्यानें असत्य भाषण कधींही करूं नये. त्याप्रमाणेंच आपल्याकडून अनान्वित कृत्यें करणारी दोन अभिषें जीं परधन, परकांता, ह्या अभिषांपासून आपलें चित्त उपल्लस ठेवावें. अशा निग्रही पुरुषाची योग्यता एकनाथानें मानिली आहे—

**कनक कांता नये चित्ता । तोचि परमार्थी पुरता ॥ १ ॥**
**हेंचि एक सत्य सार । वाउगा व्युत्पत्तीचा भार ॥ २ ॥**
**वाचा सत्यत्वें सोंवळी । येर कविता ते ओंवळी ॥ ३ ॥**
**जन तोचि जनार्दन । एका जनार्दनीं भजन ॥ ४ ॥**

प्रत्येक प्राण्यानें आपली जन्ममरणाची परंपरा चुकविण्याविषयीं प्रयत्न करावा. कारण, जन्मांतर ज्याचें संपलें नाहीं, त्या पुरुषाला गुरुबोध मुदलींच ठसणार नाहीं. जन्ममरणाच्या चक्रांत गुंतलेल्या पुरुषास ब्रह्मज्ञान प्राप्त न होता, तीर्थें क्षेत्रें, पुराणें, हीं देखील त्याची सुटका करूं शकत नाहीं.

विनोबांनीं मुलांस सांगितलेल्या—

# कल्याणकारी कथा

## प्रभुदास काका

प्रभुदास काका म्हणजे लहानशा बांध्याची एक अशक्त व निरोगी व्यक्ति. नेहमीं प्रसन्न आणि हंसतमुख असणारा त्यांचा चेहरा कोणालाहि हसवीत आणि प्रसन्न बनवीत असे.

दुसऱ्या गावचा कोणताहि माणूस काकांच्या संगतीत अर्धाएक तास आला की तो गावाविषयीं अनेक चांगले विचार आणि चांगल्या भावना सोबत घेऊन जाई. पाहुण्यांचं आदरातिथ्य करण्याची काकांना एक खास कला अवगत होती. त्यांच्या मुखातून गाव–परगावच्या अनेक गोष्टी बाहेर येत. निराश झालेला माणूससुद्धा त्यांच्या गोष्टी ऐकून प्रसन्न आणि ताजातवाना होत असे. काका हसत रहात आणि गोष्टींची कारंजी उडवीत रहात. मुलांसोबत मुलासारखे, तरुणांसोबत तरुणासारखे आणि वृद्धांसोबत वृद्धासारखे काका वागत. कधीं भांडण–तंटा मिटविण्याचा प्रसंग आला तर लोक धावत जात आणि प्रभुदास काकाना हाक देत. त्यांचं बोलणं इतकं मधुर आणि स्वभाव इतका शांत होता की वातावरण कितीहि तंग असलं तरी त्यांच्या सहवासानं तें एकदम प्रसन्न होत असे. भांडण हातोहात मिटत असे.

प्रभुदास काकांचं वय ६५ वर्षांचं होतं. त्यांच्या घरीं पाहुण्यांची रीघ लागलेली असायची. परंतु काका सर्वांच्या स्वागतात मग्न असत. ते स्वतः कधीं चहा पीत नसत परंतु पाहुण्यांना चहा पाजल्याशिवाय रहात नसत.

वय इतकं झाल्यावरहि त्यांचा एक नियम पक्का होता. ते सकाळीं पाच वाजता झोपून उठत आणि देवाचं भजन करीत. शुचिर्भूत होऊन पूजा-अर्चा करीत. त्यानंतर नियमानं बाजरीची भाकरी आणि दूध यांचा काला करून न्याहारी घेत. हें सकाळचें नित्यकर्म साडेसात वाजेपर्यंत संपे. त्यानंतर काका शेतावर जात. शेतावरून घरीं येतांना न चुकता हिरव्यागार गवताचा एक भारा डोक्यावरून घेऊन येत.

प्रभुदासकाका पासष्ट वर्षांचे झाले होते परंतु त्यांचा एक दातसुद्धा निखळला नव्हता. कोणत्याहि चांगल्या कामासाठीं ते सदा तयार रहात.

१९४२ साली आम्हीं तुरुंगांत होतो. तिथं कळलं की दोन दिवसाच्या तापाचं निमित्त होऊन काका देवाघरी निघून गेले. त्यांच्या निमित्तानं गावाची जणुं शोभा निघून गेली होती!

विनोबाजी प्रभुदास काकांसारख्या माणसांना उद्देशून नेहमी म्हणत असतात की गावात अशा सज्जनांची संख्या वाढली पाहिजे. त्यामुळें गाव आपोआप सन्मार्गावर येईल.

× × ×

गांधीजी नेहमी देशव्यापी दौरा करीत. प्रांताप्रांतातून ते फिरत. गावागावांचं निरीक्षण करीत. तेथील लोकांचं सुखदुःख आत्मीयतेनें ऐकून घेत.

एकदा गांधीजी असेच उत्कल प्रांतामधील एका गावी गेले होते. तिथं त्यांनीं एक म्हातारी पाहिली. तिनें जुनी-फाटकी साडी नेसलेली होती. ती साडी अत्यंत घाणेरडी आणि सुरकुत्या पडलेली होती. तिचा तो अवतार पाहून गांधीजी म्हणाले,

"आई, तूं या साडीला धूत का नाहीस ?"

म्हातारी म्हणाली,

"आधी माझ्या झोपडीत चला."

गांधीजी तिच्या पाठोपाठ झोपडीत गेले. तिच्या घरांत संसारपयोगी एकहि वस्तू नव्हती. बदलण्यासाठी दुसरं पटकूरहि नव्हतं. अशा स्थितीत म्हातारी आपली साडी कशी बदलणार ! आपल्या देशाची अशी कंगाल अवस्था पाहून गांधीजी अतिशय दुःखी झाले.

नंतर गांधीजींनी त्या म्हातारीला आणि तिच्याचसारख्या अनेक दरिद्री स्त्री-पुरुषांना चरखे आणि पेळू दिले. त्यांना कताई शिकविण्याची व्यवस्था केली. अन्नवस्त्राचं एक साधन चरख्याच्या रूपानं त्यांनी तेथील लोकांच्या हातात दिलं. लोक गांधीजींना धन्यवाद देऊ लागले.

आपला भारत हा एक महान देश आहे. यात ५० कोटी लोक राहतात. उत्कल प्रांतांतील त्या म्हातारीप्रमाणं अनेक म्हाताऱ्या आणि तिच्या झोपडीसारख्या असंख्य झोपड्या या देशात आहेत. गांधीजींनी विचार केला, या देशातून दारिद्र्य हद्दपार करायचं असेल तर सर्वांना देता येईल असं एखादं उत्पादक साधन उपलब्ध करून घेतलं पाहिजे. तें कमी खर्चाचं, कमी गुंतागुंतीचं आणि सर्वांना वापरता येईल असं असावं. शेवटी गांधीजींनी निर्णय घेतला की चरखा हाच त्यासाठी योग्य आहे.

चरख्यावर सूत कातता येतं. त्यामुळं विणकरांना काम उपलब्ध होतं. कापूस ओटणारे आणि पेळू बनविणारे त्यामुळं काहीं मजुरी मिळवू शकतात.

यामुळं गांधीजींनी प्रत्येक भारतीयाला सूतकताईचा व खादी वापरण्याचा आदेश दिला. आज विनोबासुद्धा प्रत्येकाला हाच उपदेश करतात. त्यांचं म्हणणं असं की आपला गरीब देश, घराघरात चरखा चालल्याशिवाय सुखी होऊ शकणार नाही. चरखा हा लज्जेला वस्त्र आणि भूकेला भाकरी देणारी एक कामधेनु आहे.

× × ×

**शिवाजी—**

राज्यभिषेक झाल्यानंतर शिवाजी महाराजांनी राज्यकारभारात अनेक सुधारणा केल्या. त्यांनी किल्ले बनविले. लोकांना सुरक्षित केलं. एकदा सहज बोलत असतांना ते म्हणाले,

" ही सारी सुव्यवस्था आमच्या राज्यकारभारामुळं निर्माण झाली आहे. "

स्वामी समर्थ रामदास शिवाजीमहाराजांचे गुरु होते. शिवाजीला आपल्या कर्तृत्वाचा अहंकार झाला आहे हे त्यांच्या लक्षांत आलं. अहंकार म्हणजे माणुसकीचा शत्रु. कांहीं झालं तरी या अहंकारापासून शिवाजीला परावृत्त केलं पाहिजे असं त्यांनीं मनाशी ठरवून टाकलं.

दुसऱ्या दिवशींचा प्रसंग. पहाडावर भिंत बांधण्याचं काम सुरू होतं. शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास उभ्याउभ्यानं तिथं काहीतरी बोलत होते. इतक्यात समर्थांनीं म्हटलं,

" शिवाजी, दगड फोडण्याचा तो हातोडा जरा इकडे घेशील."

रामदासांची आज्ञा होताच शिवाजीनी हातोडा आणला. समर्थांनी त्यांना त्या हातोड्याच्या सहाय्यानं समोरचा दगड फोडायला सांगितलं. शिवाजींनी हातोडा मारला आणि दगडाचे दोन तुकडे झाले. त्यांतुन थोडं पाणी आणि एक जिवंत बेडूक बाहेर पडला.

स्वामीजी म्हणाले,

" शिवाजी, या बेडकाचं रक्षण तूंच करतोस ना ! "

शिवाजी महाराज एका वाक्यावरून सारं काही समजले. त्यांचा अहंकार एका क्षणांत शतविदीर्ण झाला.

एकदा शिवाजी महाराजांच्या मनांत आलं,

" मी राजा. साऱ्या राज्याचा स्वामी. आणि माझे गुरुजी दारोदार भीक मागतात. ही गोष्ट काही चांगली नाहीं."

विचार मनांत येतांच शिवाजी महाराजांनीं राज्याचं दानपत्र लिहिलं आणि समर्थांच्या झोळींत टाकलं. समर्थांनीं ते पत्र वाचलं आणि हसून म्हटलं,

" शिवाजी, आता हें अवघं राज्य माझं झालं."

शिवाजीला धन्यता वाटली. त्यांनीं समर्थांना नमस्कार केला आणि म्हटलं,

" होय महाराज."

" समर्थ पुन्हा हसले आणि म्हणाले,

" आतां माझ्या राज्याचा मी तुला मुखत्यार नेमला आहे. तूं व्यवस्थितपणे याचा सांभाळ कर. "

शिवाजी महाराजांनीं समर्थांची, ती आज्ञा शिरसावंद्य मानली आणि विश्वास वृत्तीनें राज्याचा कारभार चालविला.

विनोबासुद्धां आज लोकांना हेंच सांगत नाहींत का !

जीवनांत धन्यता अनुभवायची असेल तर संपत्तीचे स्वामी न बनतां विश्वस्त बना, असाच याचा अर्थ होतो नाहीं का !

———

# नामदेवांची अमृतवाणी [ हिंदी ]

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम. ए.

76

**अपना पयांना राम अपना पयांना**

ईश्वर हेच आमचे लक्ष्य आहे, हेच आमचे उद्दिष्ट आहे. नामदेव तर अज्ञानी आहे आणि लोक सज्ञान, चतुर, अनुभवी आहेत. ज्यावेळी माझ्या हृदयांत चिंतन करता करता ईश्वरप्रेम उत्पन्न झाले त्यावेळीं राज्यवैभव भिकारी होऊन सोडून गेले. जेव्हां ईश्वरी कृपा झाली तेव्हां हा सेवक तत्क्षणी स्वामी झाला. नामदेव म्हणतात, मी ईश्वराचे गुणसंकीर्तन केले आणि परमेश्वरचरणाचा शोध घेत असतांच परमपद प्राप्त झाले.

**तूं अगाध वैकुंठनाथ ।**

हे वैकुंठनाथा! तूं अगाध आहेस. तुझ्या चरणी माझे मस्तक ठेवतो. सर्व भूतांच्या स्थळी, पृथ्वीतलावर, काष्ठांत पाषाणांत, आगम, निगम, वेद, पुराणे यांत तूं आहेस माझा मानव जन्म हीच एक अनिर्बंध ज्वाला आहे. ती सतत मला जाळीत आहे; आणि नामदेवांचा स्वामी हा दीन दयाळु आहे.

**सवै चतुरता वरतै अपनी**

केवळ आपल्या स्वतःच्या चातुर्यावर भरवंसा ठेऊन ज्याला वागता येईल असा कोणी नाही. निरपेक्षपणे क्रीडाकौतुक म्हणून जो जनांत वागतो त्याच्या अंतःकरणांतील तापाचा परिहार होतो. पिशाच्च बुद्धीच्या माणसाच्या हृदयांत कुटिलता असते. तो वरवर प्रक्षालन करण्यातच दिवसभर खपत असतो. रात्रीं, दिवसा आणि स्वप्नांतहि ईश्वराला ओळखणारा मात्र कोणी नाहीं. ज्याची वाणी ईश्वरप्रेमांत रंगली, तन्मय झाली तोच खरा साधु, तोच तपस्वी आणि तोच ज्ञाता होय. नामदेव म्हणतात, जो वारंवार रामनाम आपल्या वाचेनें घेतो त्यानेच मनःस्थैर्य प्राप्त करून घेतले आहे.

**तेरी तेरी गति तूं ही जाने**

तुझी लीला, तुझे सामर्थ्य, तुझी माया तूंच जाणतोस! माझ्याधारख्या क्षुद्र जीवाने त्याचे काय वर्णन करावे? जसे तुझ्याविषयी सांगतात तसा तूं नाहीस. स्वामी जसा आहेस तसा आहेस. पाण्यांत विरघळलेले मीठ जसे वेगळे करता येत नाहीं. तसा ईश्वर आमचा वेगळा करता न येणारा प्राणच आहे. साधुसंगतीत तूं भक्तांना भेटतोस. त्या रामरूपी सोयऱ्याला नामदेव सप्रेम वंदन करतात.

**रामची भगति बुहेली रे बापा**

सकल अस्तित्व ज्याच्या योगाने निरंतर भासमान होत असते त्या रामाची

भक्ति बाबा फार कठीण आहे. बाहेरून देह स्वच्छ केला आहे पण अंतःकरणांत मल आहे. पाण्यानें वर वर खूप प्रक्षालन केले आहे. मूर्ती अथवा पत्र्याचे देव या दोन्ही प्रकारांनीं नाम व सेवा जाणता येत नाहींत. अशा पाखंडी भक्तांनीं राम फसत नाहीं. बहिरे व आंधळे एकवेळ फसतील. नामदेव म्हणतात, माझी दृष्टि पालटली असून रामचरणी चित्त लागले आहे.

**राम जुहारि न और जुहारौ**

रामाशिवाय मी दुसऱ्या कुठल्याहि देवाची स्तुति करणार नाहीं. माझे जीवन नष्ट झाले तरी चालेल पण मी स्वाभिमान सोडणार नाहीं. दुसऱ्या देवाची करुणा भाकणार नाहीं. कारण रामरूपी अमृताचे मी प्राशन केले आहे. स्थावर, जंगम, कीटकादी क्षुद्र गोष्टींमध्यें असलेले सत्व म्हणजेच राम होय. नामदेव म्हणतात, हे रामतत्व माझे जीवन आहे. इतर देव फुकट व निरर्थक होत.

**साई मेरौ रीझौ सांचि**

माझा प्रभु सत्यावर प्रसन्न असतो. त्याच्यापुढें कपट रचले तर ते व्यर्थ आहे. परमेश्वराच्या ठिकाणीं हृदय अनुरक्त होत नाहीं, तोपर्यंत हवे तर कोणी गायन केले किंवा नर्तन केले तरी ते व्यर्थ होय. जोपर्यंत एखाद्या स्त्रीबद्दल तिच्या प्रियकराला प्रेम वाटत नाहीं, तोपर्यंत त्या रमणीनें अनेक शृंगार केले तरी त्याचा काय उपयोग ? नामदेव म्हणतात, पतिव्रता आपल्या पतीला ओळखते त्याप्रमाणे मी त्या प्रभूलाच जाणतो.

**राम नाम नरहरि श्रीवनवारी**

नरहरि, श्रीकृष्ण ही रामाचीच नांवे होत म्हणून निरंतर श्रीकृष्ण चरणांची सेवा कर. श्रीगुरुंचा शब्द हा वैकुंठाला नेणारी शीडी आहे, आणि गुरुवचन हृदय-रूपी प्रयाग क्षेत्रामध्यें प्रेमरस उत्पन्न करणारे आहे. ज्याच्याकरिता सारे त्रिभुवन धुंडाळले तो परमनिधान आपल्या देहातच आहे. म्हणून नामदेव म्हणतात, इतरत्र कोठेहि येणे वा जाणे नको! घरबसल्या रामनाम स्मरण करावे.

**जा दिन भगता आईला**

ज्या दिवशीं हरिभक्त आले त्या दिवशीं चारी मुक्ती प्राप्त झाल्या. भगवंताच्या दर्शनानें भ्रम, संशय, मिथ्या ज्ञान नाहींसे झाले. अहो! कोणास ठाऊक कोणते पुण्य फळास आले ? आणि भगवंताची प्रत्यक्ष सामोरी भेट झाली. त्याक्षणीं माझ्या जन्माचे सार्थक झाले. साधुसंगतीत खेळीमेळीनें खेळलो. पांचहि प्रबल इंद्रियांना कह्यांत आणले आणि वैष्णव भक्तांच्या हृदयांत सामावलेल्या भगवंताचे दास नाम-देवानें आनंदानें गुणगाण केलें.

---




# जानेवारी १९६८

या महिन्यांत बाहेरगांवच्या भक्तांची गर्दी शिर्डीस नेहमीप्रमाणें होती. विद्यार्थी व विद्यार्थिनी यांच्या बाहेरगांवच्या सहली बऱ्याच आल्या होत्या. कांहीं कलाकारानीं श्रींपुढे हजेरी दिली. ती खालीलप्रमाणें:—

**कीर्तन**

ह. भ. प. शालिनीबाई दिगंबर गजाकस बारामती (पुणें) संस्थान-गवई विठ्ठलराव मराठे यांची या महिन्यांत दोन कीर्तनें झालीं.

**गायन**

श्री. भोलानाथ रामनाथ समेळ, गिरगांव मुंबई.

श्री. मुरलीधर श्रीरंग सैतवडेकर, मुंबई.

सौ. आर. प्रेमाराव, न्यू दिल्ली.

श्री. विमल देशपांडे, हैद्राबाद.

श्री. मीनाबाई येवलेकरीण, येवला.

**भजनी मंडळ**

ऑल इंडिया साईसमाज मद्रास (सेक्रेटरी) श्री. शेषाद्री.

इंद्रमोहन भामरी आणि साईनाथ मंदिर धंतोली नागपूर.

श्री. गुरुदत्त वेल्हर भजनी मंडळी डी. १ सारस्वत कॉलनी, सांताक्रुझ मुंबई ५४.

श्री. सी. रामचंद्र प्रियररोड, खडकी पुणें.

## २६ जानेवारी

मे. माननीय डी. डी. पाटणकर कोर्ट रिसीव्हरसाहेब (श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी) यांचे शुभहस्ते सकाळीं ७॥ वाजतां श्रींचे मंदिरावरील कळसानजीक ध्वज वंदन सर्व संस्थान नोकर सेवेकरी, साईनाथ माध्यमिक विद्यालय सर्व शिक्षक विद्यार्थी, विद्यार्थिनी श्रीसाईनाथ बँड पथक वगैरे लवाजम्यानिशी मोठ्या उत्साहपूर्वक झाले. सर्वांस (चहापान) देण्यांत आले. रात्रौ दिपोत्सवगायन कीर्तन झाले.

## माननियांच्या भेटी

मे. न्यायमूर्ती जे. आर. मुधोळकर न्यू दिल्ली.

मे. रामचंद्रराव कमिशनर (ॲडवायर कॅनिंग) न्यू दिल्ली.

मे. जिल्हाधिकारी (यवतमाळ) वऱ्हाड.

## शिर्डी हवापाणी

शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई कांहीं नाहीं.



# Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ( १ ) | श्रीसाईसच्चरित्र | ( मराठी ) | श्री. दाभोळकरकृत | ८-०० |
| ( २ ) | ,, | ( हिंदी ) | श्री. ठाकूर | ४-५० |
| ( ३ ) | ,, | ( गुजराथी ) | श्री. सोमपुरा | ४-०० |
| ( ४ ) | ,, | ( इंग्रजी ) | Shri Gunaji | ४-०० |
| ( ५ ) | ,, | (Kannad) | N. S. Anantha Raum | ३-०० |
| ( ६ ) | **Glimpes of Indian Spirituality**– | | by Pradhan | १-०० |
| ( ७ ) | **Glimpes of Indian Spirituality** | ( Telgu ) | | १-०० |
| ( ८ ) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| ( ९ ) | साईबाबा-अवतार व कार्य | ( मराठी ) | श्री. घोंड | २-०० |
| ( १० ) | साईबाबांचे ४ अध्याय | ( मराठी ) | श्री. दासगणू | ००-५० |
| ( ११ ) | सगुणोपासना | ( मराठी ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| ( १२ ) | ,, | ( गुजराथी लिपींत ) | श्री. भीष्म | ००-२५ |
| ( १३ ) | श्री रुद्राध्याय ११ वा | ( मराठी ) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| ( १४ ) | कीर्तन पंचक | ( मराठी ) | श्री. देव | १-५० |
| ( १५ ) | शीलधी | ( मराठी ) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| ( १६ ) | श्री साईगितांजलि | ( मराठी ) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| ( १७ ) | **Guide to Shirdi** | ( English ) | | ००-१२ |
| ( १८ ) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | ( मराठी ) | | ००-२० |

**व्ही. पी. ची पद्धत नाहीं.**

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| ( 1 ) | Baba sitting on Stone 9½" × 13½" medium | 00-37 |
| ( 2 ) | „ „ in Dwarkamai 9½" × 13½" medium | 00-50 |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices.

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 50 nP. for No. 1 Postage Extra ( minimum purchase of Rs. 15 ). *Can be had from* ( मागवा ) :

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O. Shirdi. Dst. Ahmednagar.

2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr. Ambedkar Road, Dadar, Bombay 14.

लक : श्री साईबाबा संस्थान, शिरडी, आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करितां



★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते, त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते.

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स, ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि आणि त्याचप्रमाणें वैशिष्टयपूर्ण सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५२४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७

डी. डी. नेरॉय यांनी खास तयार केलेले श्री साईबाबांची तीन रंगी चित्रें, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**
मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक : शा. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक : द. दि. पाटणकर, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड